किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा

'अर्थ'बोध करून देणारे मासिक


३ ● फेरतपासणी

५ ● 'आयडेन्टिटी'च्या शोधात ताजिकिस्तान ?

११ ● टर्कीचे स्वप्न हे 'स्वप्न'च राहणार का ?

१७ ● काळवंडलेला चिनी विकास

२५ ● जिकडेतिकडे

■ढासळणाऱ्या पर्यावरणासाठी 'धर्म'काठी

३१ ● अर्थबोधपत्रिका पुरवणी

('प्रॉडक्ट पेटंट्स्', सरकार प्रायोजित संशोधन आणि सार्वजनिक कल्याण)


खंड ६ : अंक ९ डिसेंबर २००७

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**

**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.**

**वर्गणीसाठी पत्ता :**



**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२, २५६५७२१०

फॅक्स : २५६५७६९७

ई-मेल: ispe@vsnl.net, ispe@vsnl.com


---


**अर्थबोधपत्रिका**

**खंड ६ (अंक ९) डिसेंबर २००७**

**संपादक - अभय टिळक**

**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


### *'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- **अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक**
- **नि:पक्ष व साधार**
- **सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक**
- **हाताशी असणाऱ्या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी**

### *'अर्थबोधपत्रिके'चा हेतू*

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

### *'अर्थबोधपत्रिका'कशी साकारते?*

- **मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन**
- **निवडक साहित्याचे संकलन**
- **संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड**
- **संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.**

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

> जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# फेरतपासणी

'काय दिवस जातात नाही ! बघता बघता वर्ष संपलेदेखील' ...घरोघरी याच धर्तीवर चर्चा सुरू होईल... आणि चर्चेची ही वलये विरतात न विरतात तोच उंबरठ्यापाशी येऊन ठेपलेल्या २००८ सालाचे बोट धरून वाटचाल करण्यास आपण कधी सुरुवात केली हे आपले आपल्यालाच कळणारसुध्दा नाही. त्या मानाने २००७ हे वर्ष बऱ्यापैकी अनुत्पातक ठरले. फारशा उलथापालथी काही कुठे झाल्या नाहीत. त्यामुळे या वर्षाच्या आठवणी काही काळ मागे रेंगाळल्या तरी चरे-ओरखडे काही उरू नयेत. आता नाही म्हणायला आत्मघातकी दहशतवादी हल्ले, बॉम्बस्फोट यांचे सत्र पृथ्वीच्या पाठीवर कोठे ना कोठे चालू होतेच.... पण आपल्याही ते आता अंगवळणी पडलेले आहे. म्हणजे, या प्रकारांबाबत आपल्याला एक प्रकारचे प्रगाढ कोडगेपण आले आहे की, रोजच्या जगण्याचाच एक भाग म्हणून आपण साऱ्यांनीच मनोमन त्याचा स्वीकार केला आहे, याचे उत्तर ज्याने त्याने आपापले शोधावे हेच बरे. या घटनांबाबत फारसा विचार करणेही आपण आता सोडून दिले आहे. परंतु, विचार करणे अगदी पार सोडून दिले आहे, असे म्हणावे तर या बधिरपणातही नाही म्हणायला अलीकडे एक सूर अंमळ ऐकू येतो, जाणवतो. हा सूर आहे पुनर्विचाराचा, फेरतपासणीचा. आपला भवताल, आपली वाटचाल, गती - प्रगतीच्या आपल्या संकल्पना, आपली पाळेमुळे, परंपरा, भूतकाळ, त्या भूतकाळाचे वर्तमानावर पडलेले सावट.... एक ना दोन हजार विषय....! कोठे ना कोठे या साऱ्याबाबत पुनर्विचार चालू होतो आहे, याच्या खुणा दिसतात. ही प्रक्रिया जितकी स्वाभाविक आहे तितकीच स्वागतार्हही. या अशा फेरतपासणीमुळे एक 'स्पेस' तयार होते. ही अशी 'स्पेस' तयार होणे हे संधिकाळाचे लक्षण. पुनर्विचारास जेव्हा प्रारंभ होतो तेव्हा एकीकडे जुनाटाचा काच सैलावतो, तर, दुसरीकडे नवीन धारणा-आकलनांचा सांधा घट्ट बनावयाचा असतो. 'स्पेस' असते ती नेमकी इथेच. धर्म आणि आर्थिक विकास या दोन बाबींच्या परिसरात निर्माण होत असलेल्या या अशा 'स्पेस'भोवतीच 'अर्थबोधपत्रिके'चा हा अंक गुंफलेला आहे. धर्मविषयक

असे अवकाश आज निर्माण होते आहे मुख्यतः इस्लामी जगतात; तर, आर्थिक विकास या संकल्पनेभवताली साकारणारे अवकाश दृग्गोचर होते ते चीनमध्ये. बलवान आर्थिक प्रवाहांपायी परस्परांच्या निकट वेगाने खेचल्या जाणाऱ्या आजच्या जगात आपल्या धर्मविषयक पारंपरिक जाणिवा आणि त्या जाणिवांमधून स्फुरणारी 'आयडेन्टिटी' यांचे नेमके स्थान काय, याबाबत एकंदरच इस्लामी विश्वात सध्या घुसळण सुरू आहे. तर, प्रचंड उत्पादन म्हणजेच विकास या समीकरणाची पर्यावरणीय बाजू केंद्रस्थानी ठेवून या पारंपरिक धारणेचा पुनर्विचार करण्याची निकड जाणवते आहे चीनला. या फेरतपासणीचे काही पैलू 'पत्रिके'च्या या अंकात बघता येतील. ✿✿

## वाचकांचा प्रतिसाद

'अर्थबोधपत्रिके'चे अंक आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयाद्वारे आम्हा विद्यार्थ्यांना वाचण्यास उपलब्ध होतात. 'पत्रिके'चे स्वरूप अतिशय उद्‌बोधक व ज्ञानवर्धक आहे. आर्थिक साक्षरतेबरोबरच विज्ञान-तंत्रज्ञान, उद्योग, शिक्षण यांसारखे अनेकानेक विषय, तसेच 'जिकडेतिकडे' या सदरांतर्गत वाचावयास मिळणारा मजकूर वाचनीय असतो. जागतिक स्तरावर चर्चेत असलेल्या अनेक बाबींचे ज्ञान आम्हाला 'अर्थबोधपत्रिके'द्वारे प्राप्त होते. भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या या स्तुत्य उपक्रमास हार्दिक शुभेच्छा !

**प्रशांत कोल्हे, असोदा, जळगाव**

## निवेदन

• ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.

• लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# 'आयडेन्टिटी'च्या शोधात ताजिकिस्तान?

अलीकडे, मुस्लिम समाजात परस्परविरोधी विचारप्रवाह जोर धरत आहेत, असे दिसते. काही देशांमधील मुस्लिम समाज अधिक कट्टरतेकडे झुकून स्वतःला बंदिस्त करतो आहे, तर कुठे तो खुला होऊ पाहतो आहे. ज्या ज्या देशांमध्ये मुस्लिम समाज पसरलेला आहे त्या त्या देशांमध्ये असे काहीसे घडताना आढळते. ११ सप्टेंबर २००१च्या घटनेनंतर ही प्रक्रिया प्रकर्षाने निदर्शनास येऊ लागली आहे. मुस्लिम स्त्रियांनी हिजाब (डोके, कपाळ व कान झाकून घेणारा मोठा रुमाल) बांधायचा की नाही, हा प्रश्न याच विचारप्रवाहाचा एक भाग. हाच प्रश्न फ्रान्स व ब्रिटनमध्ये उपस्थित झाला होता. आता तो मध्य आशियातील एका छोट्या देशात -ताजिकिस्तानात - उपस्थित करण्यात आला आहे. असे प्रश्न काही मोजक्या देशांमध्ये वादळ निर्माण करणारे ठरत असले तरी शेवटी ते एकूणच मुस्लिम समाजाची ओळख (Identity) व मानवाधिकार या मुद्यांपर्यंत येऊन पोहचतात. तसेच समाजजीवनातील धर्माचे स्थान, या मूलभूत प्रश्नाचा विचार करण्यासही ते प्रवृत्त करतात. म्हणून ते राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे नि समाजशास्त्रीयदृष्ट्या अभ्यासाचे ठरतात. लक्षात घेण्यासारखे असे की, या तीनही देशांत हिजाब बांधायची मागणी मुस्लिम स्त्रियांनीच केली आहे.

ताजिकिस्तानमधील फातिमा नामक तरुणीने आपल्याला विद्यापीठात हिजाब बांधून जाण्याची परवानगी मिळावी, अशी मागणी केली आहे. गंमत म्हणजे तिच्या मातापित्यांनी तिला अशी मागणी करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण तिने आपला निर्णय बदलला नाही. स्त्रियांनी विद्यापीठात हिजाब घालू नये, असा आदेश तेथील सरकारने एप्रिल २००७मध्ये जारी केला आहे. त्यानंतर हिजाब बांधून आल्याने फातिमाला वर्गात बसण्याची परवानगी मिळाली नाही. म्हणून आपल्या मागणीसाठी फातिमाने शिक्षणखात्याला न्यायालयात खेचले आहे. ताजिकिस्तानात इस्लामिक कायदा असावा या उद्देशाने नव्हे, पण हिजाब बांधण्याचा फातिमाचा मानवाधिकार हिरावला जाऊ नये, या दृष्टिकोणातून एका वकिलाने फातिमाला मदत करण्याचे ठरविले आहे. ताजिकिस्तानात मुस्लिम समाजातील स्त्रिया पूर्वी paranja असा (एक प्रकारचा बुरखाच) पोषाख घालीत होत्या. तत्कालीन सोव्हिएत युनियनने

१९२०च्या दशकात paranjaवर बंदी घातली. त्यानंतर ताजिकिस्तानातील स्त्रियांच्या पारंपरिक पोषाखात हिजाबपेक्षा वेगळ्या असणाऱ्या रशियन पद्धतीच्या रुमालाची - ज्याला रशियन भाषेत platok म्हणतात त्याची - भर पडली. हिजाब घट्ट असतो व त्यातून कपाळ, कान, डोके दिसू नये असे अपेक्षित असते. platok मात्र सैलसर असतो व त्यामुळे कपाळ पूर्णपणे झाकले जाईलच असे नाही. तत्कालीन सोव्हिएत युनियनचे विघटन झाल्यानंतरच्या काळात अधिकाधिक स्त्रिया हिजाब बांधण्याकडे कल दर्शवित आहेत. हिजाब बांधणे म्हणजे कट्टरतेकडे झुकणे होय आणि हिजाब हे अरबी संस्कृतीचे निदर्शक असून ताजिक समाजात या संस्कृतीला स्थान नाही, अशी मते या संदर्भात मांडण्यात आली आहेत. शिवाय हिजाब बांधणाऱ्या तरुणींच्या धार्मिकतेवरही काहींनी शंका उपस्थित केली आहे. मोरोक्कोमधील एका लोकप्रिय 'सोप ऑपेरा'त सौंदर्यवान मुस्लिम महिलांनी हिजाब बांधल्याचे दर्शविल्याने त्याची नक्कल करायची म्हणून हा फक्त फॅशनचा प्रकार असू शकतो, असेही म्हटले गेले आहे. अर्थात, हिजाब बांधणे हा एकमेव महत्त्वाचा मुद्दा आहे, असे नाही. या घटनेशिवाय इस्लामिक साहित्याचा खप तेथे वाढतो आहे आणि मशिदीत जाणाऱ्या नागरिकांची संख्याही वाढताना दिसत आहे. याचा अर्थ एकूणच तेथील मुस्लिम समाज धर्माचरणाकडे अधिक झुकताना दिसतो आहे, असा होतो. त्यामुळे तेथील राजकारणात इस्लामला महत्त्व मिळू लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. याशिवाय, तालिबान राजवटीमुळे गाजलेला अफगाणिस्तान हा ताजिकिस्तानाचा शेजारी असल्याने तेथील मूलतत्ववादाचे वारे ताजिकिस्तानमध्ये प्रवेशले असतील किंवा कसे, अशी शंका उपस्थित होणेही स्वाभाविक ठरते. या पार्श्वभूमीवर तेथील धर्मनिरपेक्ष सरकार आणि धार्मिक गट यांच्यात मतभेद होण्याचीच शक्यता वाढते. एकेकाळी साम्यवादाच्या प्रभावाखाली राहिलेल्या ताजिकिस्तानमध्ये असे का घडत असावे ?

आजचा ताजिकिस्तान समजून घेण्यासाठी या देशाच्या इतिहासात जरासे डोकवावे लागते. इसवीसनाच्या ८१९ ते ९९९ या काळात ताजिकिस्तानात Samanids या इस्लामी-पर्शियन संस्कृती मानणाऱ्या राजघराण्याचा - अंमल होता. त्या काळी बुखारा, समरकंद आणि हेरत ही शहरे इस्लामिक कला आणि पर्शियन भाषा व साहित्य यासाठी प्रसिद्ध होती. या राजघराण्याचा अंमल संपुष्टात आल्यानंतरही तेथील इस्लामिक-पर्शियन संस्कृती शतकानुशतके टिकून राहिली. दरम्यान मध्य आशियात तुर्कांचा प्रभाव वाढला होता. तुर्कांनी या संस्कृतीतील लष्करी व राजकीय परंपरा

आत्मसात केल्या. Samanids हे आर्य होते, ते तुर्कांमधील नव्हेत, असे आजही ताजिकिस्तानात शिकविले जाते. तसेच ताजिक व Samanids यांच्यातील सांस्कृतिक संबंध हा नाजूक विषय मानला जातो. ताजिकिस्तानची चालू शतकातील लोकसंख्या सुमारे ७० लाख आहे. या देशाची अधिकृत भाषा 'ताजिक' असून ती इराणमधील पर्शियाच्या जवळ जाणारी आहे. आज ताजिकिस्तानात समरकंद व बुखारा ही शहरे आढळत नाहीत (ती उझबेकिस्तानमध्ये आहेत). आजच्या ताजिकिस्तानच्या सीमारेषा बोल्शेव्हिकांनी १९२०च्या दशकात निश्चित केल्या. तत्कालीन सोव्हिएत युनियनमध्ये असलेल्या देशांमध्ये ताजिकिस्तान हा सर्वांत अविकसित आणि गरीब देश होता.

१९८०च्या दशकात मिखाइल गोर्बाचेव्ह यांनी खुलेपणाकडे वाटचाल सुरू केल्यानंतर तत्कालीन सोव्हिएत रशियातील नागरिक आपली राजकीय मते जोरकसपणे मांडू लागले. त्या वेळी १९९० मध्ये 'इस्लामिक रिव्हाइवल पार्टी ऑफ सोव्हिएत युनियन' स्थापन झाली. तत्कालीन सोव्हिएत रशियाचे विघटन झाल्यानंतर या पक्षाची ताजिकिस्तानातील शाखा - 'इस्लामिक रिव्हाइवल पार्टी ऑफ ताजिकिस्तान'ची (IRPT) - स्थापना झाली. साम्यवाद्यांना विरोध करण्यासाठी या पक्षाने लोकशाहीवादी गटाशी हातमिळवणी केली. ताजिकिस्तानात राष्ट्राध्यक्षपदासाठी प्रथमच झालेल्या निवडणुकांच्या निकालावरून १९९२मध्ये नागरी संघर्ष झाला. त्याच वर्षाअखेरीस Emomail Rahmon हे नवे राष्ट्राध्यक्ष बनले. IRPT ने सरकारच्या विरोधातील लोकशाही गटाच्या सहकार्याने 'युनायटेड ताजिक अपोझिशन'ची (UTO) स्थापना केली. विरोधकांवर हल्ले करण्यासाठी UTOने अफगाणिस्तानच्या सीमावर्ती भागात तळ ठोकला होता. तथापि, तेथील नागरी संघर्ष हा धर्मनिरपेक्ष सरकारविरुद्ध इस्लामचे समर्थक अशा स्वरूपाचा नव्हता. प्रादेशिक स्पर्धा, विविध गटांची सत्ता मिळविण्याची महत्त्वाकांक्षा, उझबेकिस्तान आणि रशिया यांचा हस्तक्षेप, अशी काही कारणे त्यामागे होती. या सर्व घडामोडींनंतर नागरी संघर्षाला पूर्णविराम देण्यासाठी तेथे १९९७मध्ये शांततेचा करार करण्यात आला. या कराराला नुकतीच दहा वर्षे पूर्ण झाली आहेत. या करारांतर्गत लोकशाहीला प्राधान्य देण्याचे ठरविण्यात आले. प्रशासनातील ३० टक्के जागा UTO साठी राखून ठेवण्यात आल्या असून त्यातील बहुतांश जागा IRPT ला मिळालेल्या आहेत. करारानंतर राष्ट्राध्यक्ष Emomail Rahmon यांनी घटनादुरुस्ती करून आपल्या अधिकारांची व्याप्ती वाढविली आहे. त्यामुळे त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना खो बसला आहे.

दरम्यान, सोव्हिएत युनियनचे विघटन आणि देशांतर्गत नागरी संघर्ष यांमुळे ताजिकिस्ताची अर्थव्यवस्था अडचणीत आली होती. १९९७नंतर तेथील सुधारणा आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरून मिळालेले सहकार्य यांमुळे तेथील अर्थव्यवस्थेत जरा सुधारणा झाली असली तरी सर्वसामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन मात्र 'जैसे थे'च राहिले. गरिबीचे प्रमाण घटलेले नाही, वीज व पाणीपुरवठा सुरळित झालेला नाही. आर्थिक विषमता वाढलेलीच दिसते. भरीस भर म्हणून भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात आढळू लागला आहे. याशिवाय अफगाणिस्तानातील अंमली पदार्थांची आयात चोरट्या मार्गाने वाढलेली आहे. तेथील इस्लामविषयक घडामोडी समजून घेताना या पार्श्वभूमीचे भान ठेवले गरजेचे आहे.

आजच्या ताजिकिस्तानात इस्लामविषयक हिजाब हा एकच मुद्दा गाजतो आहे, असे नाही. काही वर्षांपूर्वी या देशात इस्लामविषयक साहित्य उपलब्धच नव्हते, तेथे आज मशिदींच्या नजीक, भर बाजारात आणि छोट्याछोट्या दुकानांत इस्लामविषयक साहित्य विक्रीसाठी ठेवण्यात आले आहे. त्याला प्रतिसादही मिळतो आहे. इस्लामच्या परंपरेनुसार स्त्रियांनी सार्वजनिक ठिकाणी कसे व्यवहार करावेत, याचे मार्गदर्शन करणाऱ्या ध्वनिफितीही विकल्या जात आहेत. दर शुक्रवारी मशिदीत नमाज पढण्यास येणाऱ्या मुस्लिमांची संख्या सतत वाढताना आढळत आहे.

तत्कालीन सोव्हिएत युनियनच्या अंमलाखाली असताना नागरिकांच्या धर्मपालनावर बंधने होती. मशिदी बंद करण्यात आल्या होत्या. रोझे आणि नमाज यांवरही गदा आली होती. पण सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर ही बंधने गळून पडली. त्यामुळे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आणि नागरी संघर्ष संपुष्टात आल्यानंतर तेथील नागरिक आपल्या धार्मिक भावना उघड करू लागले. याशिवाय सोव्हिएत युनियनच्या विघटनाच्या एक महत्त्वाचा परिणाम असा झाला की, ताजिकिस्तानचा इतर मुस्लिम देशांशीही संबंध येऊ लागला. इराणमधील व इतर अरब देशांमधील वाहिन्यांचे विविध कार्यक्रम ताजिकिस्तानात दिसू लागले. शिवाय, सायबर कॅफे व त्यांद्वारे इंटरनेट सेवाही तेथे उपलब्ध झाली. ताजिकिस्तानातील विद्यार्थी इराण, टर्की, इजिप्त इत्यादी देशांमध्ये शिक्षणासाठी जाऊ लागले. मक्केला भेट देणाऱ्यांची संख्या वाढू लागली. त्यामुळे इस्लामचा जनजीवनातील प्रभाव वाढू लागला. समाजातील अपप्रवृत्तींना रोखण्यासाठी, विशेषतः मद्यपान व अंमली पदार्थांपासून नागरिकांनी दूर राहावे यासाठी, इस्लाममधील तत्वे या काळात उपयुक्त ठरू लागली.

या सर्व घडामोडींवरून ताजिकिस्तानात इस्लामचे पुनरुज्जीवन होऊ लागले किंवा त्याचे 'इस्लामीकरण' (Islamization) होऊ लागले असल्याचे म्हटले जाऊ लागले आहे. पण येथे एक बाब आवर्जून लक्षात घेतली पाहिजे. इस्लामविषयक श्रद्धा तेथे पूर्वी होत्या तरी हा देश कट्टरपंथीय नव्हता. अलीकडच्या काळात 'सेक्युलर' सरकार असल्याने तेथील धर्मश्रद्धा समाजजीवनांत डोकावल्या नाहीत; मात्र, इस्लामला अनुकूल अशी मानसिकता तेथे होती या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. 'इस्लामीकरण' होणे याचा अर्थ राजकीय प्रक्रियेत धर्माची - इस्लामची - भूमिका महत्त्वपूर्ण ठरणे होय. या पार्श्वभूमीवर, समाजजीवनात धर्माची भूमिका काय असावी, हा प्रश्न ताजिकिस्तानात ऐरणीवर आला आहे.

धर्माला महत्त्व देण्यात आल्यास ताजिकिस्तानाला पुन्हा एकदा अंतर्गत संघर्षाला सामोरे जावे लागेल, असा एक मतप्रवाह तेथे आहे. १९९०च्या दशकातील संघर्षाचे परिणाम हळूहळू विस्मरणात जात असताना आता पुन्हा संघर्ष निर्माण होऊ नये असे अनेकांना वाटते. Emomail Rahmon यांच्या सरकारतर्फे राजकारणातील धर्माचे स्थान आणि दहशतवाद यांबद्दल नागरिकांना नेहमीच सतर्क करण्यात येत आहे. दरम्यान, सुन्नी गटाची संबंधित असलेल्या Salafismकडे ताजिकिस्तानातील नागरिक आकर्षित होत आहेत, असे मत मांडताना एका अभ्यासकाने या नागरिकांची टक्केवारी स्पष्ट केलेली नाही. पण त्यांच्या मते इस्लाम म्हणजे काय, या प्रश्नापासून धर्मविषयक इतरही अनेक प्रश्नांची चर्चा या समाजात होत आहे.

इस्लामकडे कल दर्शविणे म्हणजे आपणच आपल्या 'ताजिक' ओळखीला आव्हान निर्माण करणे, असेही मानले जात आहे (उदाहरणार्थ, ताजिकिस्तानातील इस्लाममध्ये 'हिजाब' नव्हता). सोव्हिएत रशियाचे विघटन झाल्यानंतर ताजिकिस्तानातील नागरिकांना इस्लामकडे वळण्याची मोकळीक मिळाली असली तरी तेथील इस्लाम हा रशियाच्या व सोव्हिएत युनियनच्या प्रभावाखाली असल्याने तो मवाळ आहे आणि धर्म व राज्य म्हणजे सरकार/प्रशासन यांच्यात भेद करणारा आहे, या विचाराला तेथे मान्यता आहे. फातिमासारख्या काही तरुणी हिजाबकडे कल दर्शवित असल्या तरी तेथील नागरिक इस्लामच्या मागे ठामपणे उभे आहेत असे चित्र नाही. सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर तेथे पाश्चिमात्य संस्कृतीचे वारे वाहू लागले आहेत. अनेक युवक हॉलिवुडमधील अभिनेत्यांची नक्कल करून पाश्चिमात्य पोषाख घालत आहेत. अनेकांना लोकशाहीला मानणारा व 'सेक्युलर' ताजिकिस्तान हवा आहे. पाश्चिमात्यांची

नक्कल करण्यात फक्त युवकच आघाडीवर आहेत असे नव्हे तर स्कर्ट आणि जीन्स घालण्यात युवतीही आघाडीवर आहेत. म्हणजे, एकीकडे हिजाब बांधणाऱ्या युवती तर दुसरीकडे पाश्चिमात्य पेहराव केलेल्या युवती असे चित्र तेथे आढळू लागले आहे.

ताजिकिस्तानातील समाजात धर्माचे -इस्लामचे - स्थान काय असावे, कसे असावे, या चर्चेला विधायक वळण देण्याचे प्रयत्न सरकारी पातळीवर व्हावेत अशी नागरिकांची अपेक्षा बनते आहे. उलट, सरकार या विषयावर खुली चर्चाच होऊ देत नाही असे काही अभ्यासकांना वाटते. मात्र, धर्माचा प्रवेश राजकारणात होऊ नये याचे पुरेसे प्रयत्न सरकारने १९९०च्या दशकातच केले आहेत. १९९४च्या धर्म व धार्मिक संस्थांच्या कार्यासंबंधीच्या कायद्यानुसार इमामांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होता येत नाही. त्यांना फतवे जारी करता येत नाहीत. सर्व धार्मिक संस्थांच्या कामकाजाच्या नोंदी ठेवणे बंधनकारक असते. मशिदींच्या संख्येवरही नियंत्रण असावे यासाठी दर १५ हजार नागरिकांमागे एक मशीद असे बंधन तेथे आहे. मशीदीत दर शुक्रवारी होणाऱ्या प्रार्थनेच्या वेळी सरकारच्या धर्मनिरपेक्ष धोरणाची दिशा पुढे चालविली जाईल याची हमी घेणाऱ्या व्यक्तीला तेथे धर्मगुरू म्हणून नेमले जाते. तसेच ध्वनिवर्धकांचा उपयोग करून मशिदीत प्रार्थनेसाठी बोलविण्यावरही तेथे बंदी आहे. सार्वजनिक ठिकाणी अरबी भाषेच्या वापरावर मनाई आहे. राजकारणातील प्रवेशासाठी धार्मिक पक्ष स्थापन करता येणार नाही अशा प्रकारचा कायदाही तेथे होण्याची शक्यता आहे. महत्त्वाचे म्हणजे 'इस्लामिक रिव्हाइवल पार्टी ऑफ ताजिकिस्तान' (IRPT) देखील सरकारच्या या धर्मनिरपेक्ष कृतींवर टीका करण्यास उत्सुक नाही. उलट IRPTचे नुकतेच दिवंगत झालेले नेते अब्दुल्ला नुरी यांनी ताजिकिस्तानचे अध्यक्ष Emomail Rahmon यांची देशांतर्गत शांतता व सुव्यवस्था याबद्दल स्तुतीच केली होती. पण त्यांच्या निधनानंतर IRPTमधील जहाल व मवाळ गट आपापले वर्चस्व सिद्ध करू लागले आहेत. त्यामुळे या पक्षाला रचनात्मक कार्याची दिशा पकडणे अवघड झाले असून पक्षाच्या कामकाजात अडथळेच निर्माण होत आहेत.

ताजिकिस्तानातील या घडामोडी अद्याप तरी धर्मनिरपेक्ष सरकारच्या नियंत्रणात आहेत. पण समाजजीवनात धर्माचे काय स्थान असावे, याविषयीची चर्चा सरकारने होऊच दिली नाही आणि धार्मिक भावना दडपल्या तर त्याचे परिणाम उलट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत सरकारने अशा खुल्या चर्चा घडवून आणणे व नागरिकांचे प्रबोधन करणे हिताचे ठरावे, असाही मतप्रवाह आहे. ✿✿

# टर्कीचे स्वप्न हे 'स्वप्न'च राहणार का ?

बहुसंख्य नागरिक इस्लामी धर्मश्रद्धा मानणारे असले तरी अधिकृतरीत्या धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाशी घटनात्मक बांधिलकी मानणारा टर्की (तुर्कस्तानचे नाव आता टर्की असे आहे) अलीकडे एका कोंडीत सापडला आहे. बहुसंख्य नागरिक इस्लामधर्मिय असूनही मुस्लिम देशांच्या गटात न जाता ख्रिस्तीधर्मीय युरोपीय समुदायात सामील होण्याचे स्वप्न या देशाने बघितले आहे. पण त्याचे हे स्वप्न साकार होण्यात अनंत अडचणी निर्माण होत आहेत. हे स्वप्न पूर्ण न झाल्यास 'ना इकडे, ना तिकडे' म्हणजे ना युरोपीय देशांमध्ये ना मुस्लिम देशांच्या गटात, अशा कोंडीत तो अडकण्याची शक्यता आहे. तसेच आपल्या गटात टर्कीला सहभागी करून घ्यायचे किंवा कसे, हा प्रश्न सध्या युरोपीय समुदायासमोरही एक आव्हान म्हणून उभा ठकला आहे. युरोपीय राष्ट्रांशी मैत्रीचा हात पुढे करणाऱ्या टर्कीला युरोपीय राष्ट्रांकडून अद्याप योग्य प्रतिसाद का मिळालेला नाही, या प्रश्नाचे उत्तर टर्की तसेच संबंधित इतर देशांच्या राजकीय, धार्मिक-सांस्कृतिक व सामाजिक कारणांमध्ये दडलेले आहे.

इतिहासकाळात ओट्टामन तुर्कांच्या अधिपत्याखाली असलेल्या या देशात इस्लामला मानणारा पुराणमतवादी गट आणि पाश्चिमात्यांच्या प्रभाव पडलेला आधुनिकतेकडे झुकणारा गट, असे दोन्ही गट एकाच वेळी अस्तित्वात होते. पण मुस्तफा केमाल पाशा (१८८१-१९३८) यांनी आधुनिकतेची (म्हणजे त्यांच्या कल्पनेप्रमाणे पाश्चिमात्यकरणाची) कास धरून या देशात आमूलाग्र बदल घडवून आणले आणि आपल्या देशातील नागरिक पश्चिमेशी मैत्री करण्यात मागे राहणार नाहीत, अशी नि:संदिग्ध ग्वाही दिली. या सुधारणांमध्ये लॅटिन लिपी स्वीकारणे, पुरुषांच्या व स्त्रियांच्या पोषाखात बदल करणे (बुरखा घालण्यावर व इस्लामिक पद्धतीच्या टोपीवर बंदी), इस्लामिक संस्था मोडीत काढून धर्मनिरपेक्ष संस्था स्थापन करणे इत्यादींचा समावेश होता. यानंतर हा देश 'नाटो'चाही (NATO-North Atlantic Treaty Oganization) सदस्य बनला. दरम्यान, १९६० ते १९८० या काळात तेथे राजकीय अस्थिरता होती. अमेरिका व सोव्हिएत युनियन या दोन महासत्तांमध्ये जगाचे ध्रुवीकरण झाले असताना

या देशाने अमेरिका व युरोपशी मैत्री केली. पश्चिमेशी जवळीक साधणाऱ्या टर्कीने आपली गणना युरोपीय राष्ट्रांमध्ये केली जावी, अशी मागणी १९६३ पासूनच केली आहे. आपल्या देशाची ओळख अशी बनणे, म्हणजे 'अतातुर्क' (राष्ट्रपिता) केमाल पाशा यांचे सर्वोच्च स्वप्न साकार करणे होय, असे या देशातील तत्कालीन नेतृत्वाला वाटत होते. पण या विषयाचा ऊहापोह युरोपीय राष्ट्रांमध्ये गंभीरपणे केला जाऊ लागला तो सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर म्हणजे १९८०च्या दशकात. पण त्यानंतरच्या काळात संबंधित देशांमधील अनेकानेक राजकीय घटना व कारणे यांमुळे याबाबत कोणताही निर्णय होऊ शकला नाही.

दरम्यान, १९९९च्या डिसेंबरमध्ये झालेल्या हेलसिंकी येथील परिषदेत याविषयाला पुन्हा चर्चेत स्थान मिळाले. त्या वेळी, युरोपीय समुदायात सहभागी होण्यासाठीच्या टर्कीच्या उमेदवारीला युरोपीय समुदायातील राष्ट्रांनी मान्यता दिली. मग, समुदायात सहभागी होण्यासाठी आपण पात्र आहोत हे सिद्ध करण्यासाठी टर्कीने आर्थिक व राजकीय सुधारणांची कास धरली. टर्कीला २००१मध्ये आर्थिक संकटाला सामोरे जावे लागले तेव्हा तत्कालीन अर्थमंत्री केमाल डेरविस यांनी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या मदतीने परिस्थिती सावरली. नोव्हेंबर २००२मध्ये तेथे झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत प्रथमच मवाळ मुस्लिम गटाच्या हाती सत्तासूत्रे आली. लक्षात घेण्यासारखे असे की टर्कीतील 'जस्टिस अँड डेव्लपमेन्ट पार्टी'ने (AKP), युरोपीय समुदायात टर्कीचा समावेश व्हावा यासाठी प्रयत्नशील राहण्याच्या मुद्यावर निवडणुकीत यश मिळविले. या भूमिकेमुळे त्यांना दुहेरी फायदा झाला. एक तर इस्लामला प्राधान्य देणाऱ्या पक्षाला समाजमान्यता मिळाली आणि या पक्षाच्या हाती सत्ता आली तरी टर्की हा आपली धर्मनिरपेक्ष भूमिकाच कायम ठेवेल, ही हमी त्यांना देशातील नागरिकांना तसेच इतर देशांमधील राजकीय नेत्यांना देता आली. दुसरे म्हणजे, टर्कीतील व्यापारी वर्ग, बुद्धिवादी नागरिक आणि मध्यमवर्ग यांचाही पाठिंबा त्यांना मिळविता आला.

युरोपीय समुदायाचे सदस्यत्व मिळविण्यासाठी Copenhagen Criteria नुसार लोकशाही सुधारणा घडवून आणण्यास आपण कटिबद्ध आहोत, असे या पक्षाने सत्ताप्राप्तीनंतर पुन्हा एकवार स्पष्ट केले. तसेच न्यायालयीन कामकाजाची पद्धत, मानवाधिकार आणि लष्करी व नागरी संबंध इत्यादीसंदर्भात युरोपीय समुदायाच्या निकषांनुसार सुधारणा केल्या. टर्कीच्या आर्थिक स्थितीतदेखील २००३पर्यंत सुधारणा होऊन तिची वाटचाल स्थिरतेकडे होऊ लागली. तेथील सुधारणांकडे युरोपीय

समुदायाचे लक्ष होतेच. सरकारच्या या कामगिरीवर समाधान व्यक्त करून युरोपीय समुदायाने आता टर्कीबरोबर सदस्यत्वाबाबत चर्चा करण्यास हरकत नाही, असे स्पष्ट केले. त्यामुळे टर्कीचे स्वप्न साकारण्याची शक्यता निर्माण झाली. मग या विषयावरील औपचारिक चर्चा २००५च्या ऑक्टोबरमध्ये चालू झाली. पण त्यानंतर दोन वर्षे उलटली तरी टर्कीसाठी ही सर्व प्रक्रिया सुकर झालेली दिसत नाही. किंबहुना, त्यात अडथळेच निर्माण झालेले दिसतात. हे अडथळे कोणते ?

टर्कीचा सायप्रस बेटाबाबत असलेला वाद आणि टर्कीची मुस्लिमबहुल लोकसंख्या, हे मुद्दे यात महत्त्वाचे ठरत आहेत. पण सायप्रस बेटाबाबतचा वाद अधिक महत्त्वाचा ठरला आहे. या संदर्भात आपली फसवणूक झाली आहे असे टर्कीला वाटते. सायप्रसची लोकसंख्या टर्कीवंशीय (Turkish Cypriot) व ग्रीक वंशीय (Greek Cypriot) या दोन वंशियांमध्ये विभागली गेली आहे. त्यामुळे हा प्रश्न टर्की व 'रिपब्लिक ऑफ सायप्रस' या दोन देशांसाठी महत्त्वाचा बनला आहे. हा देश या दोन समाजगटांमध्ये भौगोलिक रेषेद्वारे विभागला गेला असल्याने त्यांच्यातील मानसिक अंतरही वाढले आहे. ग्रीकवंशीयांना आपण ग्रीसबरोबर जोडले जावे असे वाटते तर टर्कीवंशियांनी आपण 'टर्किश रिपब्लिक ऑफ सायप्रस' असल्याचे घोषित केले आहे. ग्रीकवंशियांच्या म्हणण्याप्रमाणे सायप्रस बेटावर ग्रीक नागरिक हजारो वर्षांपूर्वीपासून वास्तव्यास होते. ही भूमी रोमन साम्राज्याच्या अधिपत्याखालीही होती. इसवीसन ११९२मध्ये Lusignans यांनी आपले राज्य तेथे स्थापन केले. तुर्कांचा प्रवेश या भूमीवर झाला तो १५७१मध्ये. काही काळ येथे ब्रिटिशांनीही राज्य केले. सायप्रस बेटाचा वाद दोन वंशियांमधील संघर्ष या रूपात पुढे आला तो ब्रिटिशांच्या काळात. आज हा वाद या देशातील नागरिक, ग्रीस, टर्की यांच्याप्रमाणेच ब्रिटन व युरोपीय समुदायासाठीही महत्त्वाचा बनला आहे.

टर्कीच्या मते हा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी काही पावले उचलली आहेत. टर्कीने ४० वर्षांपासूनची आपली भूमिका २००३ मध्ये बदलली आणि सायप्रसमधील टर्कीवंशियांना मान्य नसतानाही त्यांना काही तडजोडी स्वीकारायला लावल्या. कारण, यामुळे टर्कीची युरोपीय समुदायामध्ये सहभागी होण्याची शक्यता वाढणार होती. म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाच्या योजनेला टर्कीने व सायप्रसमधील टर्कीवंशियांनी मंजुरी दिली होती. या योजेनुसार टर्कीने सायप्रसमध्ये तैनात केलेले आपले सैन्य मागे घेऊन आपल्या ताब्यातील काही भूप्रदेशावरही पाणी सोडणे अपेक्षित होते. सायप्रसमधील

टर्कीवंशियांनी २००४मध्ये सार्वमताद्वारे या योजनेला पाठिंबा दिला पण ग्रीकवंशियांनी ही योजना फेटाळून लावली. दरम्यान, ही योजना दोन्ही बाजूंनी मंजूर करावी असे आवाहन अमेरिकेने व युरोपीय समुदायाने केले होते आणि जी बाजू पाठिंबा देईल तिला पुरस्कृत करण्याचेही जाहीर केले होते. पण यासंदर्भात त्यांच्याकडून अद्याप कोणतीच कृती झालेली दिसत नाही. सायप्रसमधील टर्कीवंशियांना आजही आंतरराष्ट्रीय पातळीवर उपेक्षा सहन करावी लागते. आर्थिक, सांस्कृतिक व राजकीयदृष्ट्या ते एकाकीच पडले आहेत, अशी त्यांची भावना आहे. 'टर्किश रिपब्लिक ऑफ नॉर्दर्न सायप्रस'ला टर्कीशिवाय कोणीच मान्यता दिलेली नाही. दुसरीकडे, सायप्रसमधील ग्रीकवंशीय युरोपीय युनियनमधील सायप्रसच्या सदस्यतेचा लाभ उठविण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे सायप्रसमधील टर्कीवंशीय नागरिक एकाकीच पडले आहेत. यामुळे आपल्या टर्कीवंशियांना आपण काहीच देऊ शकलो नाही, अशी खंत टर्कीच्या नागरिकांच्या मनात असून त्यामुळे सत्ताधारी पक्ष अडचणीत आलेला आहे.

युरोपीय समुदायाच्या ब्रसेल्स येथे डिसेंबर २००६मध्ये झालेल्या परिषदेच्या वेळी टर्कीला युरोपीय समुदायामध्ये सहभागी करून घेण्यासंबंधीच्या चर्चेची फेरी झाली. त्यावेळी टर्की व युरोपीय समुदाय यांच्यात चांगलेच खटके उडाले. टर्कीची अडचण अशी झाली आहे की सायप्रससह इतर दहा देशांनी युरोपीय समुदायामध्ये सहभागी होण्याचे ठरले तेव्हा टर्कीने युरोपीय समुदायाबरोबर व्यापाराच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले आपले 'कस्टम्स युनियन ॲग्रिमेन्ट' या दहा देशांसाठीही खुले केले. मात्र तेव्हा टर्कीच्या तत्कालीन पंतप्रधानांनी सायप्रसच्या टर्कीवंशियांना मान्यता मिळत नाही तोपर्यंत आपला देश ग्रीकवंशियांसाठी आपली बंदरे खुली करणार नाही, असे म्हटले होते. पण युरोपीय समुदायाने 'कस्टम्स युनियन ॲग्रिमेन्ट'ची अंमलबजावणी करण्याची अट घातल्याने उभयपक्षी संबंध ताणले गेले.

टर्कीची मुस्लिमबहुल लोकसंख्या हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यातच युरोपीय समुदायाला सध्या विस्ताराच्या प्रश्नाने ग्रासले आहे. या समुदायात २००४मध्ये, पूर्व व मध्य युरोपमधील दहा देश सहभागी झाले असून जानेवारी २००७मध्ये बल्गेरिया व रोमानिया हे दोन देश सहभागी झाले आहेत. या सर्व देशांना सामावून घेत असताना टर्कीची त्यात नव्याने भर नको, असे मत युरोपीय समुदायाच्या सदस्य राष्ट्रांकडून मांडले जाते. कारण, टर्कीची लोकसंख्या सुमारे सात कोटी इतकी आहे. टर्की हा आकारमानाने मोठा, गरीब आणि मुस्लिम बहुसंख्य असलेला देश आहे. या देशाने

धर्मनिरपेक्षता मान्य केली आहे. तरी तेथील बहुसंख्य नागरिकांचा धर्म इस्लाम आहे. लष्कराचा प्रभावही तेथे आहे. लोकशाहीची मूल्ये तेथे पूर्णपणे रुजलेली नाहीत, असे युरोपीय देशांना वाटते. शिवाय, युरोपीय देशांसमोर बेरोजगारी, स्थलांतरितांच्या समस्या आणि वाढता दहशतवाद हे तीन प्रश्न उभे ठाकले असताना टर्कीला सामावून घेण्याची मानसिकताच सध्या युरोपीय समुदायाच्या सदस्य देशांमध्ये नाही, असे आढळते.

टर्की व आर्मेनिया यांच्यातील संघर्ष हा जुनाच मुद्दाही तेथे अलीकडे नव्याने डोके वर काढत आहे. १९१५ मध्ये आर्मेनियातील हजारो नागरिकांची हत्या घडवून आणल्याबद्दल टर्कीला दोषी ठरविण्यात आले आहे. ही वांशिक हत्या होती हे मान्य केले जात नाही तोपर्यंत टर्कीला युरोपीय समुदायाचे सदस्यत्व मिळू नये, असेही काही युरोपीय देशांनी म्हटले आहे. 'फ्रेंच नॅशनल असेंब्ली'ने तर एका विधेयकाद्वारे ही वांशिक हत्या होती हे नाकारणे म्हणजे गुन्हा करणे होय, असे म्हटले आहे. अमेरिकेच्या काँग्रेसने याबाबत भूमिका घेतली नसली तरी या मुद्याबाबत अमेरिकाही टर्कीच्या विरोधात जाण्याची शक्यता आहे. अमेरिकेने फ्रान्ससारखी भूमिका घेतली तर प्रत्युत्तरादाखल टर्कीतील राष्ट्रवाद प्रखर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अमेरिका व टर्की यांच्यातील संबंधात दरी पडण्याचीच शक्यता अधिक.

असे असले तरी टर्कीचे भौगोलिक स्थान लक्षात घेता व्यूहात्मक दृष्टिकोणातून टर्कीला पश्चिमेशी जोडून ठेवणे गरजेचे आहे, असे अभ्यासकांना वाटते. इस्लामिक जगतातील एकमेव धर्मनिरपेक्ष असणाऱ्या या देशाच्या सीमा सीरिया, इराक आणि इराण या देशांशी तसेच अझरबैजान, जॉर्जिया आणि आर्मेनिया या देशांशी जोडलेल्या आहेत. म्हणून भौगोलिकतेचा विचार करता कॅस्पियन समुद्रातील तेल व वायू वाहून नेण्यासाठी टर्की हा देश महत्त्वाचा ठरतो. टर्कीची लोकसंख्या जास्त असल्याने पश्चिमेकडील राष्ट्रांना टर्कीची मोठी बाजारपेठही उपलब्ध होऊ शकते. शिवाय काही युरोपीय देशांमध्ये मनुष्यबळाची कमतरता असल्याने टर्कीच्या मनुष्यबळाचा उपयोगही त्यांना करता येणार आहे. जागतिक राजकारणाचा विचार करता युरोपने टर्कीशी जवळीक साधणेच उचित ठरावे अशी परिस्थिती आहे. पण फ्रान्स व जर्मनी यांनी याबाबत फारशी अनुकूलता दर्शविलेली नसून टर्की व युरोपच्या संबंधांबाबत privileged partnership असा मुद्दा पुढे आणला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर टर्कीचे युरोपीय समुदायात सहभागी होण्याचे स्वप्न, 'स्वप्न'च तर ठरणार नाही ना, अशी शंका टर्कीतील नागरिकांच्या मनात आहे.

# ANNOUNCEMENT

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

is pleased to announce the following scheme recently introduced for subscription of the ***Journal of Indian School of Political Economy (JISPE)*** for the Block Period of Three and Five years at a substantial concession resulting in huge savings (up to 33.3%) to the new as well as existing subscribers as under, provided that the subscription amount is remitted in lump-sum on or before 31st December 2007.

| ***Subscription Category*** | ***Yearly Subscription*** | ***Three Year subscription*** | ***Five Year Subscription*** |
|---|---|---|---|
| *Universities & Institutes* | *Rs. 600/-* | *Rs. 1500* | *Rs. 2000/- Plus ** |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 300/-*** | ***Rs. 1000/-*** |
| *Individuals & Colleges* | *Rs. 300/-* | *Rs. 750/-* | *Rs. 1000/-* |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 150/-*** | ***Rs. 500/-*** |
| *Savings Per cent* | *Nil* | *16.2%* | *33.3%* |

* Statistical supplement to the special issue of the JISPE on 'Political Parties and Election in Indian States : 1990-2003' comprising 335 pages and costing Rs.325/- absolutely free till stocks last.

**For more details write or email to:**

The Administrative Officer,
Indian School of Political Economy,
'Arthabodh', 968/21-22, Senapati Bapat Road,
Pune 411016

Email : ispe@vsnl.net
Fax - 25657697

Phone - 25657132
- 25657210

# काळवंडलेला चिनी विकास

'जगात कोठेही काहीही फुकट मिळत नाही. कोणत्या ना कोणत्या स्वरूपात प्रत्येक गोष्टीची किंमत ही चुकवावीच लागते - There is no such thing as a free lunch' - हे वाक्य वाचले अथवा उच्चारले तरी दिवंगत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ मिल्टन फ्रीडमन यांची आठवण होते ( हे वचन मुळात माझे नाही, असा खुलासा फ्रीडमन यांनी जाहीरपणे केलेला असला तरी या विख्यात वचनाचे जनकत्व त्यांच्याच पदरी बांधले जाते). ते काहीही असो. या वाक्याची जणू साक्षात प्रचीतीच चीनमधील प्रत्येक नागरिकाला आज येत आहे.... जीवघेण्या प्रदूषणाच्या रूपाने. नेत्रदीपक आर्थिक प्रगतीची बिरुदे मिरविणारा चिनी समाज आज त्याच विकासाच्या हातात हात घालून आलेल्या भयानक प्रदूषणाचे भक्ष्य बनत आहे. खरे म्हणजे, चीनमधील या प्रदूषणास चिनी विकासाचा सहोदर म्हणून संबोधावे की त्या विकासाची जननी म्हणावे, हाही एक प्रश्नच आहे.

सकाळ झाली तरी चिनी शहरवासियांना आजकाल सूर्यदर्शन घडतच नाही कारण चीनच्या सशक्त औद्योगिक विकासाची समर्थ केंद्रे समजली जाणारी चिनी शहरे करड्या रंगाच्या धुराच्या दुलईत लपेटलेलीच असतात. मानवी आरोग्य तसेच जीवितास हानीकारक समजल्या जाणाऱ्या विषारी वायूंच्या ढगांचे जणू चिनी शहरांवर पालाणच पडलेले असते. चीनमधील प्रदूषणासंदर्भात जागतिक बँकेने तयार केलेल्या एका अलीकडील अहवालानुसार, श्वसनास सुरक्षित आणि योग्य समजल्या जाणाऱ्या हवेबाबत युरोपीय समुदायाने जी मानके तयार केलेली आहेत त्यांचा हवाला द्यावयाचा झाला तर चीनच्या तब्बल ५६ कोटी नगरवासियांपैकी जेमतेम एक टक्का नागरिक काय ते अशा सुरक्षित हवेत श्वासोच्छ्वास करतात ! वाढत्या सुबत्तेबरोबर खासगी मालकीच्या मोटरींची वाढणारी संख्या, त्यापायी रस्त्यांवरील वाहतुकीची वाढती गजबज आणि या वाहनांमध्ये वापरले जाणारे निम्न दर्जाचे इंधन हे तीन घटक चिनी शहरांमधील वाढत्या वायूप्रदूषणास कारणभूत ठरत आहेत. धुरकटलेले हे आभाळ पुढील वर्षीच्या ऑलिम्पिक स्पर्धांपूर्वी शुभ्रधवल बनविण्यासाठी हुकुमी आणि परिणामकारक असे तंत्रमंत्र शोधण्याचा चिनी राज्यकर्ते जारीने प्रयत्न करीत आहेत.

अर्थपंडितांइतकाच राजकीय पंडितांनादेखील चीनचा आणि विशेषतः गेल्या सुमारे तीन दशकांमध्ये चीनने साध्य केलेल्या आर्थिक प्रगतीचा विस्मय वाटत असल्याचे दाखले पदोपदी मिळतात. सतत दोन दशके दरसाल सरासरी ९ ते १० टक्के वेगाने देशी ठोकळ उत्पादनात वाढ घडवून आणणे ही सहजसाध्य अशी बाब नाही. त्यातही नवलाव वाटण्याजोगी आणखी एक गोष्ट म्हणजे या प्रदीर्घ कालावधीदरम्यान चीनने चलनवाढीवरही चांगल्यापैकी नियंत्रण ठेवल्याचे अनुभवास येते. या नेत्रदीपक आर्थिक वाटचालीदरम्यान अवजड उद्योगांची चीनमध्ये झालेली दमदार वाढ आणि या औद्योगिक विकासाच्याच जोडीने फैलावणारे नागरीकरण यांचा पर्यावरणावर प्रचंड ताण येतो आहे, आला आहे. भरधाव वेगाने धावणाऱ्या विकासाच्या या चिनी इंजिनास ऊर्जेचा जो स्त्रोत अप्रतिहत पुरवला जातो त्या स्त्रोतातच चीनमधील भयकारी वातावरणीय प्रदूषणाचा उगम आहे.

चिनी आर्थिक विकासास केवळ आवश्यकच नाही तर अनिवार्य असणारा प्राणवायू मिळतो तो कोळसा जाळून. चीनमध्ये प्रदूषणाचा जो भस्मासूर पेटलेला दिसतो तो 'कोळसा' या इंधनप्रकारावर चीनच्या असलेल्या पराकोटीच्या अवलंबनापायीच. आवश्यक असलेल्या एकंदर ऊर्जेपैकी तब्बल तीन चतुर्थांश ऊर्जा ही चीनला कोळसा जाळूनच पदरात पाडून घेता येते. चीनकडे कोळशाचे साठे विपुल प्रमाणात आहेत. त्यांचा वापरही चीन सढळ हाताने करतो. संपूर्ण युरोप, अमेरिका आणि जपानमध्ये जेवढा कोळसा वापरला जातो त्यापेक्षा अधिक कोळसा आजमितीस एकटा चीन जाळतो. परंतु गंमत अशी आहे की ऊर्जानिर्मितीसाठी इंधन म्हणून कोळशाचा वापर करणारे जे काही नवीन ऊर्जाप्रकल्प चीनमध्ये उभारण्यात आलेले आहेत त्यांपैकी किती तरी प्रकल्प आणि औद्योगिक भट्ट्या इंधन ज्वलनाच्याबाबतीत अकार्यक्षमच गणल्या जातात. परिणामी, आजवर सातत्यपूर्ण राहिलेल्या आर्थिक-औद्योगिक विकासाची जननी असलेल्या ऊर्जेची परिणती ज्या प्रदूषणात आणि पर्यावरणाच्या अपरिमित हानीमध्ये होते आहे, त्या पर्यावरणीय संकटाचा सामना कसा करावयाचा ही चीनसमोरील आजघडीची सर्वांत ज्वलंत समस्या आहे.

पर्यावरणाच्या हानीपायी सार्वजनिक आरोग्याला निर्माण झालेल्या धोका इतपतच या समस्येचे स्वरूप मर्यादित नाही. प्रदूषणाच्या या संकटामुळे चिनी राज्यकर्त्यांसमोर राजकीय पेचप्रसंगही उभा ठाकण्याची शक्यता बळकट बनत आहे. कारण, या समस्येचा एक धागा आर्थिक विकासविषयक धोरणाशी अभिन्नपणे गुंतलेला आहे. अन्य देशांना

असुया वाटावी अशा पद्धतीने आजवर घडत आलेला चिनी अर्थव्यवस्थेचा विकास ही चिनी कम्युनिस्ट राजवटीची एक मुख्य कमाई आहे. चीनचे अध्यक्ष हू जिन्ताओ आणि पंतप्रधान वेन जिआबाओ यांच्या नेतृत्वाची विश्वसनीयता आणि स्थैर्य या उभय बाबी या दमदार वाटचालीशी निगडीत आहेत. आता, पर्यावरणाची धूळदाण आणि प्रदूषणापायी होत असलेल्या सार्वजनिक आरोग्याच्या हानीची किंमत मोजून साध्य होत असलेला भरीव आर्थिक विकास महत्त्वाचा की, पर्यावरणाच्या रक्षण-संवर्धनास प्राधान्य बहाल करीत पदरात पडणारी प्रगती अधिक स्वीकारार्ह या कैचीत चिनी नेतृत्व सापडल्याचे चित्र आज दिसते. पर्यावरणाची किंमत मोजत घसघशीत विकास की विकासाच्या वेगाशी तडजोड करीत पर्यावरणाचे रक्षण, हा मोठा जटिल तिढा आहे. चिनी अर्थकारणाच्या वेगवान वाटचालीशी चीनमधील विविध राजकीय तसेच सामाजिक समीकरणे मोठ्या मजेशीर रीतीने जोडली गेलेली आहेत. एक तर या प्रगतीदरम्यान चीनमध्ये लक्षणीय विषमता निर्माण झालेली आहे. आर्थिक आघाडीवरील भरधाव आगेकूच हा त्या ठुसठुसणाऱ्या जखमेवर जणू एक रामबाण उपायच चिनी नेतृत्वापाशी आहे. दुसरे म्हणजे, कम्युनिस्ट पक्षाच्या सर्वंकष नियंत्रणप्रधान व्यवस्थेत ठायीठायी नेमलेल्या अधिकारी-नोकरशहांना याच भरगच्च प्रगतीद्वारे भरघोस मलिदा मिळण्याच्या वाटाही रुंदावतात. आर्थिक आघाडीवरील वाटचाल डोळ्यात भरण्याजोगी असेल तर राजकीय नेतृत्व बदलाची चर्चा बळकट होण्याच्या शक्यता मुळातच छाटल्या जातात. परिणामी, आर्थिक विकासाचा बळी देऊन साध्य होणाऱ्या पर्यावरण रक्षणाचे श्रेय पदरात बांधून घेण्यास प्रचलित चिनी राजकीय व्यवस्था कितपत उत्सुक असेल, या बाबत शंकाच आहे. शिवाय, अर्थकारणाच्या घोडदौडीस खीळ बसली तर त्यातून उद्भवणारी सामाजिक अशांतता, त्यापायी व्यावसायिक हिताला पोहोचणारी हानी आणि पर्यायाने पक्षाच्या अंमलाला निर्माण होणारा धोकाही चिनी धुरिणांना नजरेआड करता येणार नाही.

परंतु, ऊर्जेच्या पुरवठ्यासाठी कोळसा जाळण्याने निर्माण झालेले प्रदूषणाचे आणि वेगवान आर्थिक विकासाच्या पाठपुराव्यापायी उदभवलेले एकंदरच पर्यावरणाच्या पायमल्लीचे हे संकट खरोखरच भयकारी असेच आहे. त्यामुळे होणारी चिनी सार्वजनिक आरोग्याची हानी अफाट आहे. वातावरणाच्या प्रदूषणापायी चीनमध्ये कर्करोग प्रचंड प्रमाणात फैलावताना दिसतो. किंबहुना, आजच्या चीनमध्ये कर्करोग हे मृत्युचे एक मुख्य कारण ठरत आहे. केवळ वायूप्रदूषणापायी लक्षावधी चिनी नागरिक दरवर्षी दगावत आहेत. साध्या पिण्यायोग्य पाण्यापासूनही तब्बल ५० कोटी लोक वंचित

असलेले दिसतात. पर्यावरणाची सरसहा हेळसांड आणि अफाट प्रदूषण हे चिनी व्यवस्थेचे जणू नित्याचेच अंग बनलेले दिसते. हवेमधील शिशाचे प्रमाण अतिरिक्त वाढल्याने बळी पडणारी बालके, लालसर शेवाळाने व्यापलेले समुद्र किनारे, या दलदलीतही विषारी आणि प्राणघातक द्रव्ये असल्याने सामुद्रिक जैवसृष्टीचे तिथून झालेले उच्चाटन हे सारे चिनी जीवनराहाटीचे जणू अभिन्न घटकच बनल्याचे जाणवते.

प्रदूषण आणि पर्यावरणाच्या हानीच्या या चिनी संकटाने चीनच्या भौगोलिक सीमांबाहेरही आपला प्रभाव दाखविण्यास सुरुवात केलेली असल्याने या संकटाकडे 'एक निव्वळ चिनी समस्या' इतक्याच मर्यादित भूमिकेमधून बघता येणार नाही. हे चिनी संकट आता हळूहळू जागतिक समस्येचे रूप धारण करीत आहे. कारण, फैलावलेल्या चिनी प्रदूषणाचे दुष्परिणाम आता सुदूर अमेरिकेपर्यंत जाणवू लागल्याचे हवामानतज्ज्ञांचे तर्क आहेत. कोळशावर चालणारे चिनी ऊर्जानिर्मिती प्रकल्प जे सल्फर डायॉक्साइड आणि नायट्रोजन ऑक्साइड सतत ओकत असतात त्यांपायी दक्षिण कोरियातील सेओल तसेच जपानमधील टोकियोवर आम्लयुक्त पर्जन्यवृष्टी होत असल्याचे आताशा ध्यानात येत आहे. केवळ इतकेच नाही तर, सूक्ष्मातिसूक्ष्म कणांचे वातावरणातील प्रमाण वाढल्याने अमेरिकेतील लॉस एन्जेलिस परिसरात अलीकडे जाणवू लागलेल्या प्रदूषणाचा उगमही चीनमध्येच असल्याचा 'जर्नल ऑफ जिओफिजिकल रीसर्च'चा दावा आहे. कोळसा जाळल्याने तसेच इंधनासाठी वापरल्या जाणाऱ्या तेलाच्या ज्वलनाद्वारे हवेत सोडला जाणारा सल्फर डायॉक्साइड श्वसनाचे नानाविध रोग, हृदयविकारासारख्या व्याधी यांचे प्रमाण वाढण्यास कारणभूत ठरू शकतो. असा हा घातक वायू हवेमध्ये सोडला जाण्याचा वेग बघितला तर तो चीनच्या आर्थिक प्रगतीच्या वेगापेक्षाही अधिक असल्याचे विपरित चित्र दिसते !

प्रदूषणाच्याबाबतीत चीनची अमेरिकेबरोबर जणू काही स्पर्धाच चालू आहे, असे अभ्यासकांचे निरीक्षण आहे. 'ग्रीन हाऊस' वायूंमुळे होणाऱ्या प्रदूषणाचा विचार केला तर २०१० साली वा त्यानंतर चीन अमेरिकेवर कुरघोडी करील, असा काही अभ्यासांचा अदमास होता. मात्र, आता हे वेळापत्रक पार कोलमडून पडले आहे. 'इंटरनॅशनल एनर्जी एजन्सी'च्या प्रतिपादनानुसार ही कालमर्यादा दोन वर्षे अलीकडेच येईल. तर, पर्यावरणीय बदल तसेच या बदलांचे जीवसृष्टीवर होणारे संभाव्य परिणाम अभ्यासणाऱ्या नेदरलंड्समधील यंत्रणेच्या दाव्यानुसार या पूर्वीच चीन 'ग्रीन हाऊस' वायूंचा सर्वांत मोठा उत्पादक बनलेला आहे !

चीनच्या या पर्यावरणीय हलकल्लोळाला असणारी सामाजिक बाजूही दुर्लक्षण्याजोगी अजिबातच नाही. किंबहुना, चीनमधील अनेकानेक सामाजिक उद्रेकांमागे प्रदूषणाचे संकट असल्याचे खुद्द चिनी अधिकारीही मान्य करतात. दूषित हवा आणि पिण्यास अयोग्य असणारे पाणी यांपायी चीनच्या विविध प्रांतांत सामाजिक अशांतता तसेच नागरिकांच्या उ द्रेकाचे हजारो प्रकार घडतात असे चिनी प्रशासनातील अधिकाऱ्यांचे निरीक्षण आहे. जनक्षोभामागील कारणेही संयुक्तिकच आहेत. एकतर, दूषित हवापाण्यापायी उद्‌भवणाऱ्या आजारांपायी आरोग्यावर होणाऱ्या नागरिकांच्या खर्चात लक्षणीय वाढ घडून येत आहे... आणि नेमके हे प्रदूषणच आटोक्यात येण्याची चिन्हे कोठेही दिसत नाहीत. ऊर्जावापर सघन असणाऱ्या उद्योगांच्या अप्रतिहत वाढविस्तारापायी या प्रदूषणाला जन्म देणारा कोळसा आणि त्याच वेळी आयात केले जाणारे खनिज तेल यांच्यावरील चिनी अर्थकारणाचे अवलंबन दिवसेंदिवस वाढतच आहे.

प्रांतिक स्तरावरील अधिकाऱ्यांपर्यंत निर्णयप्रक्रियेचे विकेंद्रीकरण चीनमध्ये परिणामकारकरीत्या झालेले आहे. त्याच वेळी या अधिकाऱ्यांच्या बढत्या, त्यांना सेवेमध्ये मिळणारे अन्य लाभ, प्रोत्साहने यांसारख्या बाबी त्या अधिकाऱ्यांनी आपापल्या अखत्यारीतील प्रांतामध्ये आर्थिक -औद्योगिक प्रगती किती वेगाने घडवून आणली यावर अवलंबून असतात. साहजिकच आपापल्या प्रांतात अधिकाधिक गुंतवणूक व्हावी, नवनवीन उद्योग स्थापन व्हावेत, त्या उद्योगांचा विस्तार दमदार पद्धतीने व्हावा यासाठी हे अधिकारी सर्वतोपरी प्रयत्नशील असतात. या प्रगतीसाठी आवश्यक असणाऱ्या ऊर्जेचा पुरवठा हा पुन्हा कोळसा जाळूनच होतो. कोळसा जाळला की प्रदूषण फैलावते. नोकरीतील लौकिक 'तरक्की' ही प्रांताच्या औद्योगिक प्रगतीशी जोडलेली असल्याने केंद्रीय स्तरावरील नेतृत्वाने पर्यावरणाच्या रक्षणासाठी कितीही आटापिटा केला तरी प्रांतिक स्तरावरील अधिकारी-नोकरशाही तिला तितकासा प्रतिसाद देताना दिसत नाही. परिणामी, प्रदूषण नियंत्रणाचे आणि पर्यावरण रक्षणाचे चिनी आव्हान हे उत्तरोत्तर सघन, रौद्र आणि बिकट बनत असल्याचे पर्यावरणवाद्यांचे मत बनते आहे.

सर्वांत ज्वलंत प्रश्न बनला आहे तो या भयकारी प्रदूषणाच्या मानवी अस्तित्व तसेच आरोग्यावर होणाऱ्या गंभीर परिणामांचा. आजमितीस चीनमधील हा सर्वाधिक नाजूक प्रश्न ठरला आहे. त्यातही मजा अशी आहे की प्रदूषणापायी उद्‌भवणाऱ्या व्याधी तसेच त्या व्याधींना बळी पडणारे रोगी यांच्या संदर्भातील कोणतीही आकडेवारी प्रसिद्ध करण्यावर चिनी नेतृत्वाने बंदी जारी केली आहे. ही आकडेवारी समाजासमोर

# कोळशाला पर्याय अणुऊर्जेचा....

दमदार आर्थिक वाढ, वाढीची गती मंदावू नये यासाठी प्रगतीच्या इंजिनाला ऊर्जेचे भरभक्कम डोस, ऊर्जेचा हा पुरवठा अ-खंडित राहण्यासाठी अक्षरशः लक्षावधी टन कोळशाची आहुती, कोळसा जाळल्याने निर्माण होणारे अपरिमित प्रदूषण, त्यापायी मानवी जीवन तसेच जीवनमानाच्या गुणवत्तेची होणारी हानी, प्रदूषणापायी उद्भवणारे पर्यावरण रक्षणाचे प्रश्न, यातून निपजणारी सामाजिक अशांतता.... आणि अखेर अर्थकारणाची घोडदौड कायम राखत असतानाच पर्यावरणाचाही तोल सांभाळण्याची कसरत या साऱ्या चक्रव्यूहात सापडलेल्या चिनी नेतृत्वाला यातून सुटण्यासाठी आता आशेचा किरण दिसतो आहे तो अणुऊर्जेच्या रूपाने. भविष्यात उद्भवणारी ऊर्जेची वाढती गरज भागविण्याबरोबरच पर्यावरणाचा ढासळता तोल सावरण्यासाठी अणुऊर्जेचा पर्याय मुख्यत्वाने अवलंबण्यासाठी आगामी काळात चीन वेगाने सक्रिय बनेल, अशी सारी चिन्हे आज दिसत आहेत. कोळशाच्या वापरापायी निर्माण होणारे जीवघेणे प्रदूषण, त्या प्रदूषणाचा विशेषतः चीनच्या शहरी लोकजीवनावर होत असलेला कमालीचा अनिष्ट परिणाम आणि त्यापायी मोठ्या प्रमाणावर उद्भवणारी सामाजिक अशांतता यांपायी अणुऊर्जेचा पर्याय विशेष आकर्षक ठरून अणुऊर्जेच्या निर्मितीस सरकारी पातळीवरूनच प्राधान्य प्रदान केले जात आहे. चीनच्या लेखी एकंदरच ऊर्जा सुरक्षेचा विषय इथून पुढे कायमच विलक्षण जिव्हाळ्याचा राहणार आहे. जागतिक अर्थव्यवस्थेतील चीनचे महत्त्व आणि आजच्या अमेरिकाकेंद्री वैश्विक सत्तातोलात एक पर्यायी ताकद म्हणून उभे राहण्याची चीनची क्षमता या उभय बाबी चीनच्या ऊर्जासुरक्षेशीच अभिन्नपणे जोडलेल्या आहेत. इंधन म्हणून अणुऊर्जा वापरून तयार केल्या जाणाऱ्या विजेचे चीनमधील एकंदर वीजनिर्मितीत असणारे प्रमाण आजमितीस तीन टक्क्यांहूनही कमीच आहे. जागतिक पातळीवरील सरासरीपेक्षा ते अल्पच म्हणावे लागेल. अणुऊर्जेद्वारे निर्माण होणाऱ्या विजेचे वैश्विक स्तरावर एकूणांत असलेले प्रमाण हे जवळपास १६ टक्के इतके आहे. १९८८ सालापासून या प्रमाणात फारसा फरक पडलेला नाही. दक्षिण कोरियामध्ये तर हे

प्रमाण जवळपास ४० टक्क्यांइतके आहे. पर्यावरणाशी सुसंवादी असा इंधनपर्याय या कारणाबरोबरच ऊर्जाविषयक सुरक्षेची बाजू बुलंद बनविण्याच्या प्रेरणेने फ्रान्स आणि जपानसारखे देश अणुऊर्जेकडे १९७०च्या दशकातच वळले. आजमितीस चीन नेमका त्याच मनःस्थितीत असल्याचे दिसते. आण्विक भट्टया उभारण्यासाठी लागणारा प्रदीर्घ कालावधी, करावी लागणारी अगडबंब गुंतवणूक, ऊर्जानिर्मितीदरम्यान निर्माण होणाऱ्या अणुकचऱ्याचे व्यवस्थापन व विल्हेवाट यांसारख्या नानाविध जटिल प्रश्नांना आजही समाधानकारक उत्तरे मिळालेली नाहीत. तरीही कोळसा व खनिज तेलासारख्या मर्यादित नैसर्गिक ऊर्जासाधनांचा वीजनिर्मितीसाठी वापर आणि त्यातून निपजणारा प्रदूषणाचा भस्मासूर यांवर उपाय म्हणून अणुऊर्जेचा पर्याय जोमदारपणे पुढे येतो आहे. जेम्स लव्हलॉक आणि पॅट्रिक मूर यांच्यासारखे अग्रगण्य पर्यावरणवादीही अणुऊर्जेच्या पर्यायाची तरफदारी करू लागले आहेत, हे या संदर्भात लक्षणीय ठरते. वीजनिर्मितीसाठी पर्यावरणसंवादी इंधनस्त्रोत म्हणून अणुऊर्जेचा पर्याय चाचपण्याच्या चिनी प्रयत्नांना ही सारी पार्श्वभूमी आहे. आजमितीस चीनमध्ये कार्यान्वित असलेल्या ११ अणुभट्ट्यांची प्रस्थापित क्षमता ८.७ गिगावॅट्सची असून आणखी १२ अणुभट्टया नजिकच्या भविष्यात कार्यान्वित करण्याच्या दिशेने चीन कार्यरत आहे. २०२० सालापर्यंत अणुऊर्जेची प्रस्थापित क्षमता ४० गिगावॅट्सपर्यंत उंचावण्याचे अधिकृत उद्दिष्ट चीनने आपल्या नजरेसमोर ठेवलेले आहे. अणुऊर्जा निर्मितीचा प्रकल्प आणि त्यासाठी केली जाणारी घसघशीत गुंतवणूक स्थानिक पातळीवरील अर्थकारणास जोमदार चालना पुरविते, असा अनुभव असल्याने प्रांतिक सरकारेही अणुऊर्जा प्रकल्पांच्या स्थापनेस उत्सुक असल्याचे चित्र आजमितीस दिसते. परिणामी, अणुऊर्जेच्या निर्मितीचा पर्याय केंद्रीय नेतृत्वाने प्रांतिक नेतृत्वाच्या गळी उतरविण्यासाठी प्रयत्नशील बनण्याऐवजी, आपापल्या प्रांतात अणुऊर्जा निर्मितीप्रकल्प उभारण्यास अग्रक्रम द्यावा यांबाबत स्थानिक पातळीवरील नागरिकांचाच दबाव केंद्रीय नेतृत्वावर येत असल्याचे चित्र चीनमध्ये अनुभवास येते. अणुऊर्जानिर्मितीसाठी आवश्यक असलेल्या तंत्रज्ञान तसेच साधनसामग्रीची चिनी बाजारपेठ यामुळे भविष्यात रुंदावेल हे वेगळे सांगावयास नकोच ! ■■

आली तर त्यापायी मोठ्या प्रमाणावर सामाजिक असंतोषास वाचा फुटेल अशी भीती या मागे आहे, असे मत या विषयात आजमितीस संशोधन करणारे चिनी अभ्यासक व्यक्त करतात. चीनमधील प्रदूषणापायी दरवर्षी किती नागरिक मृत्युमुखी पडतात या बाबत काही अप्रकाशित संशोधन अहवालांनी वेळोवेळी प्रकाशित केलेली सांख्यिकी ही खरोखरच धक्कादायक अशीच आहे.

चीनमधील 'अकॅडमी ऑफ एन्व्हायर्न्मेन्टल प्लॅनिंग'ने २००३ साली तयार केलेल्या एका अहवालानुसार वायूप्रदूषणापायी दरवर्षी चीनमध्ये तब्बल तीन लाख लोक मृत्यूच्या दाढेत ढकलले जातात. यापैकी बहुसंख्य हे हृदयविकार तसेच/अथवा फुफ्फुसाच्या कर्करोगाचे बळी ठरलेले असतात, असे या अभ्यासाचे अनुमान आहे. ही भयकारी बाजू झाली केवळ सर्वसाधारण, सार्वजनिक वायूप्रदूषणाची. घरांतर्गत प्रदूषणही तितकेच उत्पातक आहे. स्वयंपाकघरात वापरले जाणारे इंधन, पुरेशी हवा खेळण्यास वावच मिळू न देणारी अशी घराची रचना, सदोष बांधणी, घरबांधणीमध्ये वापरले गेलेले निकृष्ट दर्जाचे बांधकाम साहित्य यांच्या माध्यमातून होणाऱ्या प्रदूषणापायी आणखी सुमारे १ लाख ४० हजार मृत्यू घडून येत असावेत, असा अदमास या अभ्यासातच सहभागी असलेल्या एका अभ्यासकानेच व्यक्त केला.

सरकारी माध्यमातून २००५ साली तयार करण्यात आलेल्या एका अभ्यासानुसार हवेच्या प्रदूषणापायी अकाली मरण पावणाऱ्यांची वार्षिक संख्या २०१० सालापर्यंत ३ लाख ८० हजारांच्या घरात जाईल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हीच संख्या २०२० सालापर्यंत ५ लाख ५० हजारांपर्यंत वाढेल, असेही हा अभ्यास म्हणतो. प्रदूषणाच्या बळींसंदर्भात चीनच्या पर्यावरणविषयक राष्ट्रीय संस्थेबरोबर जागतिक बँकेनेही एक संयुक्त प्रकल्प अलीकडेच हाती घेतला होता. सार्वजनिक ठिकाणी अनुभवास येणाऱ्या प्रदूषणापायी चीनमध्ये दरवर्षी सुमारे साडेतीन ते चार लाख नागरिक अकाली मृत्युमुखी पडतात, असे हा अभ्यास म्हणतो. घरांतर्गत प्रदूषण प्रति वर्षी आणखी तीन एक लाख लोकांचे प्राण हरण करते. तर, सुमारे ६० हजार लोक हे दूषित पाण्यामुळे उद्‌भवणाऱ्या अतिसाराबरोबरच आतड्याच्या कर्करोगाचीही शिकार ठरतात. मात्र, ही आकडेवारी जनतेसमोर आली तर सामाजिक असंतोषास सामोरे जावे लागेल, या भीतीपायी अहवालातून ती वगळावी असा धोशा सरकारी यंत्रणेने लावला ! आता बोला !! विस्मयाने जगाला तोंडात बोटे घालावयास लावणारा चिनी भरधाव आर्थिक विकास हा असा (शब्दशः) काळवंडलेला आहे. ✿✿

# ढासळणाऱ्या पर्यावरणासाठी 'धर्म'काठी

पृथ्वीचे वाढते तापमान, वातावरणातील बदल आणि ढासळणारे पर्यावरण या प्रश्नांनी जगाला इतके वेढले आहे की त्यातून जगाची सुटका व्हावी यासाठी जो तो आपल्या परीने काही कृती करू पाहतो आहे. अलीकडे विविध देशांमधील काही धर्मवादीही यात उतरले आहेत. आपापल्या धर्मातील शिकवणीच्या आधारे नागरिकांनी पर्यावरणाचे रक्षण करावे, असे आवाहन ते करीत आहेत. ब्रिटन, अमेरिका, स्वीडन, फ्रान्स, टांझानिया, कोलंबिया, मंगोलिया, चीन, जपान आणि भारत अशा अनेक देशांमध्ये असे घडते आहे. अलीकडे सर्व धर्मांमध्ये एक समान धागा आढळतो. तो म्हणजे वातावरणीय बदलांचे, वृक्षतोडीचे, प्रदूषणाचे आणि काही जाती-प्रजाती नष्ट होण्याचे आव्हान पेलायचे असेल तर राजकीय व आर्थिक मुद्द्यांचा विचार करण्याबरोबर मानवी जीवन व पर्यावरण यांच्यातील संबंधांच्या आध्यात्मिक बाजूचाही विचार केला पाहिजे, ही जाणीव हा होय. या संदर्भात 'अलायन्स ऑफ रिलिजन्स अँड कॉन्सर्वेशन' (ARC) अशी चळवळही आकाराला आली आहे. संयुक्त राष्ट्रसंघानेही या घडामोडींची दखल घेतली असून राष्ट्रसंघाचे सरचिटणीस Ban ki-moon यांनी धर्म व वातावरणातील बदल याविषयासाठी Palmer यांची विशेष सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे.

पिकाडिली येथील 'सेन्ट जेम्स चर्च'ने पर्यावरणरक्षणासाठी पावले उचलली आहेत. १६८४साली बांधण्यात आलेले हे इंग्लंडमधील एक मोठे चर्च असून त्याच्या छतावर सौरऊर्जेचे पॅनेल बसविण्यात आले आहेत. चर्चसाठी खर्च होणाऱ्या एकूण विजेपैकी एक पंचमाश विजेची गरज यांद्वारे भागविली जाते. पर्यावरणाशी सुसंगत असे व्यवहार करणारे म्हणून इंग्लंडमधील हे सर्वात 'हिरवे चर्च' मानले जाते. ख्रिस्ती धर्मगुरूंनी आपले दैनंदिन व्यवहार पर्यावरणाशी सुसंगत असे राखावेत, असे आवाहन ब्रिटनमधील 'चर्च ऑफ इंग्लंड'ने केले आहे. म्हणजे आपल्या ज्या कृतींमुळे वातावरणातील कार्बन डायॉक्साइडचे प्रमाण वाढू शकते त्या कृती टाळून इतर पर्यायांचा वापर करावा, असे सुचविण्यात आले आहे.

या शिवाय, नैसर्गिक संसाधनांचा वापर मानवाने अतिशय काटकसरीने करावा, असे आवाहन दिवंगत पोप जॉन पॉल यांनी त्यांच्या अमदानीत १९८७ सालीच एका

विशेष पत्राद्वारे जगभरच्या नागरिकांना केले होते. तर चर्चचे पर्यावरणविषयक सल्लागार Foster यांनी म्हटले आहे की, ही पृथ्वी देवाकडून मानवाला मिळाली आहे ती वास्तव्यासाठी, तिचे शोषण करण्यासाठी नव्हे, हे तत्व ख्रिस्ती धर्मात अंतर्भूत आहे. त्यामुळे पर्यावरणीय मूल्यांची जपणूक करण्याची सजगता ख्रिस्तीधर्मियांना नवी नाही. म्हणून प्रत्येक ख्रिस्तीधर्मियाने आपापल्या परीने पर्यावरणाची काळजी घेण्यास कटिबद्ध झाले पाहिजे.

धर्म व राजकारण यांच्यात फारकत असावी, असे म्हटले जात असले तरी राजकारणावर धर्माचा प्रभाव आहे, असे या संदर्भात दिसते. २००० साली हेग येथे भरलेल्या परिषदेत पर्यावरणाच्या रक्षणासाठी असलेला क्योतो प्रोटोकॉल मंजूर करण्यासाठी सुमारे २३ देशांमधील धार्मिक नेत्यांनी आपापल्या देशांमधील सरकारांकडे आग्रह धरला होता. साम्यवादाचा भरपूर अनुभव पाठीशी असलेला रशियाही यापासून दूर राहू शकलेला नाही. रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांनी या करारावर सही करावी यासाठी २००४मध्ये त्यांच्यावर दबाव आणण्यात रशियातील चर्चने पुढाकार घेतला होता. अमेरिकेतील पर्यावरणवाद्यांच्या दृष्टीने ही बाब विशेष महत्त्वाची आहे. कारण, अमेरिकेने या करारावर अद्याप सही केलेली नाही आणि अमेरिकेतील ख्रिस्तीधर्मिय नागरिकांचे गट बुश प्रशासनाशी जवळीक साधून आहेत. त्यामुळे या गटांच्यामार्फत क्योतो प्रोटोकॉल मंजूर करण्याबाबत बुश यांच्यावर दबाव आणता येईल किंवा कसे याबाबतचा विचार हे पर्यावरणवादी करीत आहेत.

पर्यावरणाचा विषय 'Lutheran Church of Sweden'ने उचलून धरला असून त्यांनी 'अलायन्स ऑफ रिलिजन्स अँड कॉन्सर्वेशन'कडे याबाबत संपर्क साधला आहे. त्यांच्या चर्चेत वनव्यवस्थापनाच्या मुद्याला प्राधान्य देण्यात येत आहे. कोलंबियातील कॅथॉलिक चर्च आणि अमेरिकेतील एक स्वयंसेवी संस्था यांनी परस्परसहकार्याने या विषयात पुढे जाण्याचे ठरविले आहे.

बौद्ध धर्मानेही पर्यावरणाचा विषय गांभीर्याने घेतला आहे. बौद्ध धर्माचा पर्यावरणविषयक विचार शालेय अभ्यासातील क्रमिक पुस्तकांमध्ये मांडण्यात आला आहे. भारतातील शालेय शिक्षणातही पर्यावरणाचा समावेश करण्यात आला आहे. शिवाय, गंगा व यमुना या नद्यांच्या प्रदूषणाबाबत हिंदू धर्माचा आधार घेतला जात असल्याचे म्हटले जाते. भारत सरकारने १९८५मध्ये 'गंगा कृती योजना' आखून तिच्या अंमलबजावणीसाठी आजवर अक्षरशः कोट्यवधी रुपये खर्च केले आहेत.

मात्र ही योजना यशस्वी झालेली नाही. दर १२ वर्षांनी भरणाऱ्या कुंभ मेळ्यांदरम्यान होणाऱ्या वाढत्या प्रदूषणाबाबतही अलीकडे विशेष जागृती दिसत येत असून त्या दिशेने विचारमंथनही घडते आहे.

चीनमध्ये बौद्ध धर्माचा, ताओइझमचा व कन्फ्युशियानिझमचा प्रभाव आहे. तेथील सुमारे दहा हजार ताओवादी मंदिरांनी सौरऊर्जेच्या दिशेने पावले टाकली आहेत. तसेच नैसर्गिक संसाधनांचा व ऊर्जेचा वापर कमी करण्यावर भर देण्यासाठी लोकशिक्षणाचा मार्ग स्वीकारला आहे. जपानमधील 'असोसिएशन ऑफ शिंतो श्राईन्स' यांनीही 'अलायन्स ऑफ रिलिजन्स अँड कॉन्सर्वेशन'कडे याबाबत संपर्क साधला आहे.

पर्यावरणाच्या रक्षणासाठी कटिबद्ध होण्यात इस्लामही मागे नाही. टांझानियाच्या मिसाली बेटानजीक घडलेली ही घटना. निसर्गसौंदर्याची उधळण झालेल्या या भागात मुस्लिम मच्छिमारांचे वास्तव्य. सुमारे एक हजारावर मच्छिमारांचे जीवन निळ्याशार पाण्यातून मिळणाऱ्या माशांवर अवलंबून. १९९०च्या दशकात येथील सागरी जीवनाचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होऊ लागल्याचे आढळले. या मागील कारणाचा शोध घेतला असता असे लक्षात आले की हे मच्छिमार मासे पकडण्यासाठी जाळ्यांचा उपयोग करण्याऐवजी स्फोटकांचा वापर करून स्फोट घडवून आणत होते व त्यामुळे मृत झालेले मासे किनाऱ्यावर आले की ते पकडून आपला रोजी-रोटी कमवित होते. पर्यावरण धोक्यात आल्याने तेथील सरकारने १९९६मध्ये पर्यावरणविषयक जनजागृती मोहीम हाती घेतली व आपणच आपल्या निसर्गाची जपणूक करावी, असे आवाहन केले. तसेच असे स्फोट घडवून आणणाऱ्या मच्छिमारांवर कारवाई करण्यात येईल असेही स्पष्ट केले. पण तरी अनेक मच्छिमारांनी याकडे फारसे लक्ष दिले नाही.

पण याची दखल ब्रिटनमधील 'इस्लामिक फाउंडेशन फॉर इकॉलॉजी अँड एन्व्हायर्नमेंटल सायन्सेस'चे संचालक Fazlun Khalid यांनी घेतली. इस्लामचे तत्त्वज्ञान आणि पर्यावरण यांची सांगड त्यांनी घातली. "अल्लाह हा सर्वशक्तिमान व सर्वांचा धारणकर्ता आहे. सर्व जग त्याच्यात सामावलेले आहे. या जगात Mizan - म्हणजे एक प्रकारचा समतोल आहे. हा समतोल कायम राखणे हे मानवाचे कर्तव्यच ठरते. नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास अल्लाहला मंजूर नाही, त्यामुळे आपण त्याचा वापर काटकसरीने करावा," अशी भूमिका त्यांनी या मच्छिमारांसमोर मांडली. याचा प्रभाव पडून चांगले मुस्लिम असणे म्हणजे पर्यावरणाचा ऱ्हास न करणे होय, अशी खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली व स्फोटकांचा वापर थांबवून मासेमारीसाठी ते

पुन्हा जाळे वापरण्याच्या आपल्या परंपरागत पद्धतीकडे वळले. सौदी अरेबियातही शरियाचा आधार घेऊन पाण्याचे व्यवस्थापन करण्याच्या काही पद्धतींचा अवलंब करण्यात येत आहे.

संयुक्त राष्ट्रसंघातर्फे या विषयात लक्ष घालणारे Palmer म्हणतात की जगभरात धर्माचे जाळे व्यापक प्रमाणावर पसरले आहे, ही बाब राष्ट्रसंघाने व जागतिक बँकेने समजून घेतली आहे. विशेषतः विकसनशील देशांमधील गरीब नागरिकांच्या मनावर धर्मश्रद्धांचा पगडा अधिक आहे. पृथ्वीचे वाढते तापमान, वातावरणातील बदल, पर्यावरणाचे रक्षण यांबाबत काही प्रचार-प्रसार करताना धर्मविषयक श्रद्धा फार मोठी भूमिका बजावू शकतात. वातावरणातील बदलाच्या प्रश्नाने संपूर्ण जग चिंतित बनले असून कोणत्याही मार्गाने का होईना पण त्याबाबत कृती होणे गरजेचे आहे, असा मतप्रवाह आढळतो. ही बाब ध्यानात घेऊन पर्यावरणाच्या रक्षणासाठी सर्व प्रकारच्या कृती करण्यास प्रोत्साहन देण्यात येत आहे. चंगळवाद व उपभोगवादी प्रवृत्ती वाढत असताना संयम शिकविण्याचे काम धर्म करू शकतात, असेही Palmer म्हणतात. याचबरोबर स्वार्थत्याग, परस्परसहकार्य, दुसऱ्यांप्रती करुणा, स्वयंशिस्त, मोहावर विजय इत्यादी बाबी धर्मसंस्कारामुळे शक्य होऊ शकतात इतका धर्माचा प्रभाव नागरिकांवर आहे. शिवाय सर्व धर्मांचे सूत्रही साधारणपणे असेच असते. धर्मश्रद्धेची भाषा ही बहुतांश नागरिकांना चटकन समजते व भावते, म्हणूनही असे प्रयत्न करण्यात आडकाठी करण्यात येत नसावी.

एकविसाव्या शतकात जगातील बहुतांश नागरिकांना धर्म जवळचा वाटत असला तरी काही देशांमध्ये धर्मांतर्गत प्रश्नही आहेत. शिवाय, धर्मांशी संबंधित असणाऱ्या अनेक संस्था/प्रार्थनास्थळे इत्यादी अतिशय सुसंघटित आहेत असेही नाही. त्यामुळे धर्माच्या आधारे पर्यावरणरक्षणाचे कार्य कितपत पुढे जाईल अशी शंकाही उपस्थित करण्यात आली आहे. आणखी एक वास्तव असे की आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान आणि सशक्त बनविण्याची संधी अलीकडेच उपलब्ध झालेल्या देशांमधील नागरिक पर्यावरणाच्या प्रश्नाकडे गांभीर्याने बघतील असेही नाही. तरीही पर्यावरणाच्या हानीमुळे कोसळणाऱ्या समाजाला उभारी देण्याचे हे प्रयत्न वाया जाणार नाहीत, असा काहींचा आशावाद आहे. कारण, एकूण परिस्थितीच अशी आहे की, ढासळणाऱ्या पर्यावरणाला 'धर्मकाठी'च्या आधारे का होईना, पण जीवदान मिळाले तर ते हवेच आहे.

## प्रमुख संदर्भ

(1)Far Eastern Economic Review-October 2007 (2) Current History (3) news.bbc.co.uk.in (4) www.geographical.co.uk (5) ec.europa.eu/enlargement (6) www.csmonitor.com (7) www.euractive.com (8) www.worldpress.org (9) en.wikipedia.org/wiki (10) www.cia.gov/library (11) Fueling Asia's Growth: A Review Focus on oil and Energy - Steve Kidd, Erica Downs and Pramit Pal Chaudhuri, Far Eastern Economic Review- September 2007 (12) As China Roars, Pollution Reaches Deadly Extremes - New York Times, http://www.nytimes.com/2007/08/26/world/asia/26china.html_=1&oref=slogin (13) The Oxford Encyclopedia of the Modern Islamic World Volume 1,2,3 and 4. (14) ...आणि भारतातील औषधे महाग झाली, अर्थबोधपत्रिका, जून २००५ पृष्ठ १६ ते १९,

✿✿

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ

# कर्ता-करविता

### आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रुपये

**ग्रंथ घेणाऱ्यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**

## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

(१ जून २००६ पासून)

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## 'प्रॉडक्ट पेटंट्स्', सरकार प्रायोजित संशोधन आणि सार्वजनिक कल्याण

- डॉ. सत्यजित रथ

जागतिक व्यापार संघटना अथवा व्यापारसंलग्न बौद्धिक स्वामित्व संपदाविषयक विविध तरतुदींशी सुसंगत अशी धोरणप्रणाली आखण्यासंदर्भात भारताने नेमकी काय भूमिका घ्यावी, हा सार्वजनिक चर्चेचा मुद्दा बनला तो वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे माजी महासंचालक डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील तांत्रिक समितीच्या अनुषंगाने उद्‌भवलेल्या मतामतांच्या गलबल्यापायी. त्यातल्या त्यात पुन्हा, मुख्यत्वेकरून अधिक हिरीरीने चर्चिला गेला तो 'प्रॉडक्ट पेटंट्स्'चा विषय. आरोप-प्रत्यारोपांच्या मुबलक फैरीही या संदर्भात आजवर झडलेल्या आहेत. परंतु, आपण अंगिकारलेल्या संबंधित धोरणांत सुधारणा घडवून आणण्याच्या दिशेने या आदानप्रदानाचे पाऊल पडावे, असे आपल्याला वाटत असेल तर मात्र आरोप-प्रत्यारोपांच्या संकुचित वर्तुळापलीकडे जाणाऱ्या काही व्यापक पैलूंचा विचार करणे भाग पडते.

देशाच्या स्वातंत्र्योत्तर वाटचालीदरम्यान, 'प्रॉडक्ट पेटंट्स्'पेक्षाही 'प्रोसेस पेटंट्स्'ची प्रणाली आणि या धोरणप्रणालीची कारकीर्द ही भारताच्या लेखी अधिक पोषक वा हितकारक ठरली, असा एक सर्वसाधारण विचारप्रवाह भारताने जागतिक व्यापार संघटनेच्या करारावर स्वाक्षरी केली त्या वेळी देशभरात होता. मात्र, त्याच वेळी एक तडजोड म्हणून 'प्रॉडक्ट पेटंट्स्'ना अनुमती दिल्याबद्दल भारताला पुरेसा मोबदला मिळण्याच्या तरतुदी जागतिक व्यापार संघटना/व्यापारसंलग्न बौद्धिक स्वामित्व संपदाविषयक कार्यप्रणालीत आहेत, अशीही धारणा त्यामागे होती. हा निर्णय घेण्यामागील लाभहानीच्या गणिताचे जे पृथःकरण केले गेले होते त्याच्या अचुकतेबाबत तेव्हा गंभीर मतभेद होते (किंबहुना, आजही आहेत). परंतु, या संदर्भात वेळोवेळी मांडल्या

गेलेल्या विविध मतांमध्येही, 'ही तडजोड नसून 'प्रॉडक्ट पेटंट्स्' हे भारताच्या हिताचे संवर्धकच ठरतील वा आहेत', असा सूर काढणारे अल्पसंख्यच होते.

मात्र आता १० वर्षांनंतर भारत सरकारने आपली भूमिका बदललेली दिसते. 'प्रॉडक्ट पेटंट्स्'ना अनुमती देणे ही तडजोड नसून वस्तुतः 'प्रॉडक्ट पेटंट्स्' हे देशाच्या पथ्यावरच पडणारे आहेत, असे सूर आता सरकार आळवत आहे. पेटंट संदर्भातील कायद्यात जागतिक व्यापार संघटनेच्या तरतुदींशी सुसंगत बदल घडवून आणण्याबाबत सरकार एवढे उत्सुक बनलेले आज जे दिसते आहे, त्याची संगती सरकारच्या भूमिकेत घडून आलेल्या उपरोक्त परिवर्तनाचा अर्थ समजावून घेतल्याखेरीज लावता येणार नाही. या तडजोडीपायी उद्भवू शकणाऱ्या संभाव्य प्रतिकूल परिणामांचा मुकाबला करण्यासाठीही सरकारने काहीही पावले उचललेली दिसत नाहीत, या सरकारच्या वर्तनाचाही अर्थ लागत नाही. 'प्रॉडक्ट पेटंट्स्'ना अनुमती देणे, ही मुळात तडजोड नाहीच, ही सरकारची पक्की धारणा बनल्याचाच हा संकेत मानावयास हवा. 'वैश्विक पटलावरील एक जबाबदार आण्विक महासत्ता', असे बिरुद स्वतःला बहाल करून घेताना इतिहासाचा जसा सरकारने पुनर्शोध लावला होता, तसाच काहीसा प्रकार इथे घडला आहे.

अर्थात, त्यातही असाधारण असे काहीच नाही. इतिहासकालात केव्हा तरी करावी लागलेली एखादी लज्जास्पद तडजोड ही 'तडजोड' नसून वस्तुतः तो 'विजय'च होता, असा आविर्भाव आणण्यासाठी इतिहासाचा पुनर्शोध लावण्याचा भारताचा जणू परिपाठच आहे. फजिती लपविण्यासाठीचा हा सदान्‌कदाचा आमचा खटाटोप हा अंशतः आमच्या वासहतिक पार्श्वभूमीचा आणि वसाहत्तोतर काळातील चिंता-अस्थिरता-विवंचनांचा परिपाक असावा. आपल्याला सोयीस्कर असाच आपला इतिहास असावा या भाबड्या इच्छेपेक्षाही, उपलब्ध पुराव्यानिशी शाबीत होणाऱ्या इतिहासाचेच गाठोडे आपल्याला वागवावे लागणार आहे, हीच खूणगाठ सध्या आपण मनाशी बांधू. जागतिक व्यापार संघटनेच्या करारावर भारताने केलेली स्वाक्षरी आणि परिणामी जागतिक व्यापार संघटनेच्या व्यापार संलग्न बौद्धिक संपदा स्वामित्व प्रणालीविषयक तरतुदींशी सुसंगत असे बदल पेटंटविषयक भारतीय धोरणांत घडवून आणण्याबाबत आम्ही स्वीकारलेली बांधिलकी, ही एक तडजोडच होती, असे आपण घटकाभर गृहीत धरून चालू. एकदा ही भूमिका स्वीकारल्यानंतर मग 'प्रॉडक्ट पेटंट्स्'संदर्भात आमचा व्यावहारिक आणि सुज्ञ प्रतिसाद काय असावयास हवा ?

या संदर्भात घेता येण्याजोगी सर्वांत सोपी, साधी, सरळ भूमिका अशी : 'प्रोसेस पेटंट्स्' ऐवजी 'प्रॉडक्ट पेटंट्स्' च्या अमदानीपुढे मान तुकविणे ही आमच्या लेखी एक तडजोडच असल्याने, जागतिक व्यापार संघटनेशी केलेल्या करारास बांधील राहून पेटंटविषयक आजच्या धोरणात जे किमान बदल करणे अत्यावश्यक आणि अनिवार्य आहे, तेवढेच बदल आम्ही करू. त्याच वेळी, या तडजोडीच्या संभाव्य, अनिष्ट वा विपरित परिणामांची झळ आम्हाला बसू नये, यासाठी आवश्यक असे धोरणात्मक कवचही आम्ही सिद्ध ठेवू. मात्र असे कवच तयार करताना मूळ करारातील तरतुदींचे कोठेही उल्लंघन होणार नाही, याची आम्ही पुरेपूर दक्षता घेऊ. तसेही बघितले तर, जागतिक व्यापार संघटनेबरोबर केलेला करार हा व्यापारी स्वरूपाचा करार असून त्या संबंधी काही वाद उद्‌भवलाच तर त्याबाबत निवाडा करण्यासाठी लवादाकडे धाव घेण्याचा पर्याय सर्वच सदस्य देशांना खुला आहेच. समजा, भारताला या लवादापुढे खडे करण्याचा पर्याय उद्या काही देशांनी निवडलाच तर भारत आपली भूमिका या लवादासमोर पोटतिडकीने मांडेल. त्या सुनावणीत, समजा, लवादाचा निकाल भारताच्या विरोधात गेला तर कराराशी सुसंगत असे किमान बदल पेटंटविषयक आपल्या कायद्यात भारत घडवून आणेल. यात, वैषम्य वाटण्यासारखे काहीच नाही. अर्थातच, स्वाभिमानाबाबतच्या आमच्या अंमळ फुगलेल्या वा फुगविलेल्या जाणिवांना या बाबींचे शल्य खुपेल, परंतु ते ठीक आहे. व्यवहारतः सुसंगत अशी ही भूमिका एकदा मान्य केल्यानंतर मग आपल्याला काय काय पावले उचलावी लागतील ती आता पाहू.

प्रथम भारताने 'प्रॉडक्ट पेटंट्स्' आणि 'प्रॉडक्ट पेटंट्स्'प्रणाली स्वीकारली पाहिजे. मात्र त्याच वेळी 'प्रॉडक्ट पेटंट्स्' बहाल करणे, ही केवळ आपद्धर्माचीच बाब समजावयाची. साहजिकच अशी 'प्रॉडक्ट पेटंट्स्' बहाल करणे हे दुष्कर असावयास हवे. ते सहजसाध्य राहणार नाही. आता पुढचा प्रश्न. यासाठी, २००५सालीचा दुरुस्त केलेल्या पेटंटविषयक कायद्यात बदल करणे गरजेचे आहे का ?... या प्रश्नाचे उत्तर 'नाही', असे आहे. याचे कारण असे की, 'प्रॉडक्ट पेटंट्स्' अदा करण्यातील दुष्करता ही त्या संबंधीच्या कार्यकारी नियमावलीतच अंतर्भूत करता येणे शक्य आहे. पेटंट अदा करण्याची कार्यपद्धती अशी तयार करावयाची की, मला पेटंट अदा करणे हे का व कसे संयुक्तिक आहे याची खातरजमा संबंधित यंत्रणेला करून देण्याचे उत्तरदायित्व हे अर्जदारावरच राहील. पेटंट हे सहजगत्या अदा होणारच नाही. ते पदरात पाडून घेण्यासाठी अर्जदारास सबळ युक्तिवाद करावयास लागला पाहिजे. 'प्रॉडक्ट पेटंट्स्'

पदरात पाडून घेण्यासाठी करावी लागणारी कार्यालयातील प्रक्रिया या प्रकारे बनविली की अर्जदाराच्या युक्तिवादातील एखाद्या बारीकशा मुद्याला वा तरतुदीला चिकटून राहून 'प्रॉडक्ट पेटंट्स्' नाकारणे हे पेटंटविषयक कार्यालयास शक्य व्हावे. त्याच वेळी, ज्या मुद्यावरून अथवा तरतुदीच्या अधीन राहून 'प्रॉडक्ट पेटंट्स्' नाकारले गेले आहे तो मुद्दा वा पैलू माझ्या 'केस'मध्ये गैरलागू कसा ठरतो, त्याबाबतचे आपले म्हणणे पेटंट अदा करणाऱ्या कार्यालयासमोर सादर करण्यासंदर्भातील कार्यप्रणालीही अर्जदाराने तयार करून ठेवायची.

रासायनिक नवपदार्थांच्या संदर्भातील पेटंटविषयक संभाव्य निर्बंध तसेच अतिसूक्ष्म प्राणीजीवजन्य जिनसांची संभाव्य वगळणूक, हे दोन विषयही याच टप्प्यावर उपस्थित होतात. माशेलकर समितीने याच उभय पैलूंचा अभ्यास करणे अपेक्षित होते. मात्र, आश्चर्याची बाब ही की समितीने नेमके त्याबाबतच काही केले नाही. औषधांच्याबाबत बोलावयाचे तर रासायनिक नवपदार्थ तसेच मॉलेक्यूलर नवपदार्थांपुरतेच 'प्रॉडक्ट पेटंट्स्' सीमित ठेवता येतील. मात्र, यासाठीही या उभय संकल्पनांची तांत्रिक व्याख्या अतिशय काटेकोरपणे करण्याबरोबरच प्रत्येकासाठी किमान प्रमाणीकरणाची काही मानकेही सुस्पष्ट करावी लागतील. हीच गोष्ट अतिसूक्ष्म प्राणिजीवजन्य जिनसांची. एखाद्या विशिष्ट उद्देशानेच केलेल्या थेट मानवी हस्तक्षेपाद्वारे सुधारणा केलेल्या अतिसूक्ष्म प्राणिजीवजन्य जिनसांच्या निर्मितीसाठीच 'प्रॉडक्ट पेटंट्स्' अदा करण्याची तरतूद करावयाची आणि त्यासाठी आवश्यक असणारी तांत्रिक व्याख्याही (मानवी हस्तक्षेपाद्वारे सुधारलेला अतिसूक्ष्म प्राणिजीवजन्य पदार्थ वा चीज वा उत्पादन) कमालीची काटेकोर बनवावयाची.

जागतिक व्यापार संघटनेच्या या संदर्भातील तरतुदींचा भारताने जो अन्वय केलेला आहे त्याबाबत जागतिक व्यापार संघटनेच्या करारावर स्वाक्षरी केलेल्या एखाद्या देशास काही अडचण वा आक्षेप असतील तर आपले गाऱ्हाणे घेऊन लवादाकडे जाण्यास ते मोकळे आहेतच. भारतही त्या लवादापुढे आपले म्हणणे सादर करील. लवादाचा निवाडा भारताच्या विरोधात गेल्यास लवादाच्या निर्णयातील नेमक्या सूचनांबरहुकूम आवश्यक ते किमान बदल भारत आपल्या संबंधित धोरणांत घडवून आणेल.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या लेखी 'प्रॉडक्ट पेटंट्स्' हे अहितकारक आहेत, असे जे सार्वत्रिक मतैक्य आहे ते रास्त वा खरे आहे असे आपण घटकाभर गृहीत

धरले आहे. 'प्रॉडक्ट पेटंट्स्'च्या अमदानीच्या प्रतिकूल परिणामांची झळ सुसह्य बनावी यासाठी आणखी काय काय करणे आवश्यक आहे, ते आता आपण पाहू.

यासाठी, स्वातंत्र्योत्तर काळातील प्रारंभीच्या काही वर्षांत डोकवून पाहणे उद्‌बोधक ठरेल. ज्या रासायनिक वा औषधी जिनसांच्या निर्मितीची पेटंट जगातील अन्य उत्पादकांकडे वा देशांकडे आहेत अशा पदार्थांचे संयुगीकरण घडवून आणण्याच्या पर्यायी रासायनिक प्रक्रिया देशी उद्योजक-उत्पादकांना उपलब्ध व्हाव्यात, या हेतूने भारत सरकारने प्रचंड गुंतवणूक करून सार्वजनिक क्षेत्रात संशोधन संस्थांची निर्मिती केली. सार्वजनिक क्षेत्रातील अशा संस्थांमधून संशोधन करणाऱ्या भारतीय रसायनशास्त्रज्ञांनी देशी औषध कंपन्या तसेच सर्वोपयोगी, व्यापक स्वरूपाच्या रसायन-औषध निर्मितीस अतिशय मोठे उत्तेजन पुरविले. आजच्या 'प्रॉडक्ट पेटंट्स्'च्या जमान्यात, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे स्पर्धेचे आव्हान स्वीकारत, कायदेशीर 'पेटंट बस्टिंग'च्या क्षेत्रात सरकारी अर्थसाह्य आणि गुंतवणूक करण्याची समांतर निकड निर्माण झाली आहे. जे उत्पादन किफायतशीर ठरले आहे वा सार्वजनिक हिताच्या संवर्धनाच्या दृष्टीनेच जे महत्त्वाचे आहे, असे एखादे विशिष्ट 'प्रॉडक्ट पेटंट्स्' निवडायचे. खरे तर, एकाच उत्पादनासाठी मिळविलेल्या पेटंट्स्‌ची मालिकाच नजरेसमोर ठेवायची, असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल. त्या पेटंटशी संलग्न संपूर्ण साहित्य, त्याचा तपशील त्याच्या कायदेविषयक तसेच तांत्रिक अंगांनी अतिशय बारकाईने अभ्यासावयाच्या आणि मग त्या पेटंटला बगल देण्याचे कायदेशीर आणि तांत्रिकदृष्ट्या कल्पक असे मार्ग शोधावयाचे. या सगळ्याचा अंतर्भाव 'पेटंट बस्टिंग'मध्ये होतो. सर्वोपयोगी स्वरूपाच्या औषधांची निर्मिती करणाऱ्या भारतीय औषध कंपन्यांना या साऱ्याचा खचितच लाभ होईल.

त्याहीपुढे जाऊन 'प्रॉडक्ट पेटंट्स्'ना पर्याय उपलब्ध करून देणाऱ्या प्रक्रिया व कार्यपद्धतींमध्ये भारत सरकारने गुंतवणूक करणे अगत्याचे आहे. 'प्रॉडक्ट पेटंट्स्'च्या अमदानीत ही आता निकडीची बाब बनली आहे. कारण, अखेर पेटंट ज्याच्यावर अधिष्ठित होते असे बव्हंशी सारे संशोधन (विशेषतः जैवतंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील) हे जगभरच सार्वजनिक क्षेत्रातील संशोधन संस्थांमध्ये साकारते. सरकारच्या अर्थसाहाय्याद्वारे सिद्ध होणाऱ्या संशोधनाचे पेटंटिंग करण्याबाबत धोरणात्मक भूमिका सरकारने घेणे, आता अगत्याचे बनले आहे. सरकारी अर्थसाहाय्यातून साकारलेल्या संशोधनांचे पेटंट पदरात पाडून घेऊन तो शोध लावणाऱ्या संशोधकानेच खासगी क्षेत्रातील कोणाकडे

तरी (व्यापारी तत्वावरील उत्पादनासाठी) ते सुपूर्त करावयाचे, अशी सरकारी अर्थसाहाय्यातून सिद्ध होणाऱ्या संशोधनाबाबतची विद्यमान स्थिती आहे. या प्रघाताला, अमेरिकेतील Bayh - Dole Legislationच्या धर्तीवरच भारतीय संसदेनेदेखील कायदेशीर अधिमान्यता द्यावी, अशीच चर्चा आताशा सुरू आहे. सार्वजनिक क्षेत्रात आकाराला आलेले संशोधन आणि त्या संशोधनांती तयार झालेली उत्पादने ही जर नफेखोरीमागे लागली, नफा कमवू लागली तर त्या संशोधनाची विश्वसनीयता टिकून राहील का, यासारखे प्रश्न यातून निर्माण होतात. अशा प्रकारे झालेली विश्वसनीयतेची हानी सार्वजनिक धोरणाला भूषणावह ठरेल का, हा त्यापुढचा प्रश्न. या बाबतची, सामाजिक भावना जरी एकवेळ बाजूला ठेवली तरी मुख्य प्रश्न उरतो तो हा की, सरकारी बळाच्या पाठिंब्यावर जे वैज्ञानिक वा शास्त्रीय संशोधन फळास येते त्याचा सार्वजनिक कल्याणासाठी नेमका उपयोग काय, हा. सध्या अस्तित्वात असलेली 'प्रॉडक्ट पेटंट्स्'ची प्रतिबंधात्मक प्रणाली व अमदानी या पैलूंसंदर्भात काहीही हमी वा हवाला देत नाही. निव्वळ यासाठी तरी सरकारी पाठिंब्याद्वारे अस्तित्वात आलेल्या संशोधनाची फळे सार्वजनिक हित तसेच कल्याणासाठी वापरता येतील, अशा काही तरी पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याची नितांत निकड भासते. यासाठी कशा प्रकारच्या व्यवस्था तयार करता येतील ?

या प्रश्नाचे उत्तर शोधीत असताना आपल्याला याच्याशीच संलग्न अशा अन्य चिंता-विवेचना-आशंका ध्यानात घेणे भाग पडते. सार्वजनिक क्षेत्रात संशोधनाच्या कामात मग्न असलेल्या शास्त्रज्ञ-संशोधकांना त्यांच्या संशोधनाद्वारे निर्माण होणाऱ्या नफ्यापासून वंचित ठेवले गेल्यास एका पातळीवर ते जसे अन्यायकारक ठरेल तसेच (किंवा त्याहीपेक्षा अधिक) शास्त्रज्ञ-संशोधकांचा तो तेजोभंग ठरून ते हतोत्साही बनतील, ही यातील पहिली भीती. दुसरे म्हणजे, पेटंट्स्च्या खोड्यात अडकवली न गेलेली सरकारी वा सार्वजनिक क्षेत्रातील साधनसामग्री तिसऱ्याच अन्य कोणासाठी तरी पेटंट पदरात पाडून घेण्यास साहाय्यभूत ठरेल. तिसरे म्हणजे विद्यमान पेटंट अमदानीत अध्याहृत असणारा एकाधिकारशाह उत्पादक हा सार्वजनिक हिताच्या खचितच मुळावर येणारा आहे वा ठरेल. परिणामी, सार्वजनिक क्षेत्रात सिद्ध होणारे संशोधन हे कोणालाही वापरण्याजोगे खुले ठेवावे ही भूमिका कितीही रास्त असली तरी 'प्रॉडक्ट पेटंट्स्'च्या विद्यमान जमान्यास सरकारने दिलेला तो प्रतिसाद म्हणून निश्चितच पुरेसा नाही. आपल्या संशोधनास द्रव्यरूपात प्रोत्साहन मिळण्याच्या अपेक्षेत असणाऱ्या

वैज्ञानिक-संशोधकांना ज्याप्रमाणे तो संतुष्ट करू शकत नाही त्याचप्रमाणे खुल्या सार्वजनिक संशोधनांती तयार होणाऱ्या फलनिष्पत्तीद्वारे खासगी 'प्रॉडक्ट पेटंट'साठी तयार मालमसाला मिळवून देण्यासही तो अटकाव करीत नाही. त्यासाठी पर्यायी उपाययोजना जारीने शोधावयास हव्यात. या संदर्भात दोन शक्यतांचा विचार येथे करता येईल.

एक म्हणजे, 'क्रिएटिव्ह कॉमन्स'ची एक व्यवस्था सरकारच्या साहाय्यातून निर्माण करावयाची. नवसंशोधकांनी, संशोधकांनी तयार केलेली नवनवीन तंत्रज्ञाने, उत्पादन पद्धती-प्रक्रिया या साऱ्या या 'क्रिएटिव्ह कॉमन्स'मध्ये जमा करावयाच्या. मग त्याचा विनियोग कोणीही - कशासाठीही - अगदी अफाट नफा कमावण्यासाठीही - करो. पुढे जे संशोधक, उत्पादक, नवशोधक या मूळ संशोधनात सुधारणा करतील वा भर घालतील ते सारे नवशोधनही पुन्हा या 'क्रिएटिव्ह कॉमन्स'मध्येही जमा होईल - खुल्या वापरासाठी. संगणकीय सॉफ्टवेअरच्या विश्वातील 'ओपन सोर्स' संकल्पनेसारखीच ही संकल्पना. वनस्पतींच्या जनुक अभियांत्रिकीशी संलग्न तंत्रज्ञानाच्या विश्वात आदानप्रदानास एक समाईक व्यासपीठ मिळवून देण्याबाबत जे प्रयत्न काही जीवशास्त्रज्ञ अलीकडील काळात करीत आहेत, त्याचेही उदाहरण या ठिकाणी डोळ्यासमोर ठेवता येईल. या कार्यपद्धतीमुळे सार्वजनिक तंत्रज्ञानाचा विनियोग खासगी पेटंट्स्च्या प्राप्तीसाठी केला जाण्यास प्रतिबंध होतो. मात्र, त्याद्वारे या तंत्रज्ञानांच्या मूळ शोधकास द्रव्यरूपाने काही परतावा मिळण्याची मात्र हमी या चित्रात कोठेही दिसत नाही.

'प्रॉडक्ट पेटंट्स्'च्या जमान्यास बगल देण्याचा दुसरा मार्ग म्हणजे मूळ शोधकाच्या हक्कांची, बौद्धिक स्वामित्वाची रीतसर अधिकृत नोंदणी करणारी शासनप्रणित एक व्यवस्था निर्माण करणे. पेटंटप्रणालीप्रमाणेच या व्यवस्थेतही मूळ संशोधक आपल्या तंत्रज्ञानाची नोंदणी करील. फरक इतकाच की नोंदणीकृत तंत्रज्ञान वा संशोधन व्यापक वापरासाठी उपलब्ध होईल. या वापराबाबतची कायदेशीर तरतूद अशी की, एखाद्या उत्पादकाने या तंत्रज्ञानाचा वापर करून व्यापारी तत्वावर उत्पादन सुरू करून नफा कमाविला तर काही एक किमान शुल्क नोंदणी व्यवस्थेस आणि ते तंत्रज्ञान शोधणाऱ्या मूळ संशोधकास काही 'रॉयल्टी' त्या उत्पादकाने अदा करावयाची. हे शुल्क आणि 'रॉयल्टी' यांच्या रकमादेखील त्या संबंधीच्या कायदेशीर तरतुदीत निर्देशित केलेल्या असतील. त्याबाबत सुस्पष्ट असे नियम असतील. या रकमा वाटाघाटींद्वारे निश्चित होणार नाहीत. या कार्यपद्धतीमुळे संशोधकांना त्यांच्या संशोधनाबद्दल द्रव्यरूपाने परतावा

- प्रोत्साहन पदरात पाडून घेता येईल. मात्र, त्याच वेळी कोणाच्या तरी संशोधनावर दुसराच कोणी तरी पेटंट पदरात पाडून घेऊन नफा कमावतो आणि मूळ संशोधक कोरडाच राहतो, असे तरी घडणार नाही. सार्वजनिक क्षेत्रातील संशोधनावर बेतलेले सर्व पेटंट्स् फाइल करताना, असे पेटंट वापरून व्यापारी तत्वावर उत्पादन करण्याबाबतचे अधिकार हे इच्छुक उत्पादकांना परवाना अदा करून देता येतील, या प्रकारची नियमावली सरकार व्यवहारात आणू शकते. परवाना अदा करण्याची ही प्रक्रिया वा प्रणाली ना वगळणूकीच्या तत्वावर आधारलेली असावी. तसेच, पेटंटशी संलग्न 'शो फी' आणि 'रॉयल्टी'ची टक्केवारी संबंधित नियमावलीतच निर्देशित केलेली असावयास हवी. तिथे, सौदेबाजीस वाव नसावा.

अर्थातच, उपरोक्त कोणती तरी एकच पद्धत वा प्रणाली व्यवहारात राबविण्यापेक्षा त्यांची संमिश्रे अधिक श्रेयस्कर ठरतील. या विविध पर्यायांपैकी एक वा एकापेक्षा अनेक पर्याय वा व्यवस्था स्वयंप्रेरणेने निवडण्याचे स्वातंत्र्य सर्व संबंधितांना बहाल करणे, हे न्याय्य आणि समृद्ध समाजव्यवस्थेच्या दृष्टीने हितकर ठरेल की एकाच प्रकारची व्यवस्था सर्वांना बंधनकारक करणे हे अधिक उचित ठरेल, या बाबतही विचारमंथन होणे गरजेचे आहे. मात्र, उपरोक्त कोणताही पर्याय हा जागतिक व्यापार संघटनेने निर्धारित केलेल्या व्यापारसंलग्न बौद्धिक स्वामित्वविषयक प्रणालींचे उल्लंघन करणारा नाही, याची खूणगाठ पुन्हा एकवार मनाशी बांधणे अत्यावश्यक आहे. तसेच, त्यासाठी नवीन कायदा वगैरे करण्याचीही जरुरी अजिबात नाही. परंतु, हे सारे समूर्त साकार बनविण्यासाठी नितांत निकड कशाची म्हणून जर असेल तर ती आहे केवळ राजकीय आणि प्रशासकीय प्रबळ इच्छाशक्तीची !

✿✿

*(प्रस्तुत लेखाचे लेखक डॉ. सत्यजित रथ हे दिल्ली येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इम्युनॉलॉजी येथे संशोधक - अभ्यासक म्हणून कार्यरत आहेत. भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीमध्ये उपरोक्त विषयावर आयोजित करण्यात आलेल्या एका चर्चासत्रात डॉ. सत्यजित रथ यांचे मुख्य भाषण झाले होते).*

## *ग्रंथालयातील नवी पुस्तके*

**Indian Cities in Transition; Edited by Annapurna Shaw, Orient Longman Private Limited, Hyderabad, First published 2007, Pages - xxiii + 500, Price - Rs. 850/-**

भारतात १९९१ साली अवतरलेल्या आर्थिक सुधारणा पर्वाचे भारतीय अर्थकारणाच्या विविधांगांवर जे भलेबुरे परिणाम झाले त्यांचा ऊहापोह करणारे विपुल संशोधन - लेखन आजवर अभ्यासकांना उपलब्ध झालेले आहे. त्या लेखन संभारात भरही पडताना प्रत्यही दिसते. परंतु, या पुनर्रचना कार्यक्रमाचा भारतातील नागरीकरणाच्या प्रक्रियेवर नेमका काय परिणाम आणि तो कसा झाला याचा लेखाजोखा मांडणारे साहित्य या संभारात त्या मानाने तुरळकच आढळते. त्यातही पुन्हा आंतरविद्याशाखीय संशोधन - अध्ययन पद्धतीचा अवलंब करून आर्थिक सुधारणा कार्यक्रमाच्या शहरी परिणामांचा मागोवा घेणारे लेखन तर अधिकच दुर्मिळ. प्रस्तुत ग्रंथाचे महत्त्व जाणवते ते नेमके यामुळेच. या दस्तऐवजाचे संदर्भमूल्य हे आणखी एका कारणासाठीही विशेषत्वाने वाटते. शहरीकरणाची प्रक्रिया भारताच्या विविध राज्यांत वेगवेगळ्या प्रकारे साकारत असल्याचे अनुभवास येते. नागरीकरणाच्या या विकास-विस्तारात वैविध्याच्याच जोडीने असमतोलही भरपूर प्रमाणात आहे. या विषम नागरी विस्तारापायी मोठ्या शहरा-महानगरांच्या एकंदरच व्यवस्थेवर पडणाऱ्या ताणांचे विश्लेषण करणारे संशोधन अलीकडे वाढत्या प्रमाणात हाती घेतले जाऊ लागले आहे. भारतात आजवर राबविल्या गेलेल्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी अर्थकारणाची जी क्षेत्रे मुख्यत्वाने राहिलेली आहेत (उदाहरणार्थ बँकिंग, वित्तव्यवहार, विमा, भांडवल बाजार, चलनव्यवहार, परकीय भांडवली गुंतवणूक, परकीय चलनविषयक व्यवहार, माहिती तंत्रज्ञान उद्योग तसेच माहिती तंत्रज्ञानाधारित उद्योग इत्यादी) ती बव्हंशी शहरकेंद्रीच असल्याने उदारीकरणाच्या वाऱ्यांनी ती ढवळली जावीत, हे स्वाभाविकच ठरते. या क्षेत्रांमधील घडामोडींचा प्रभाव शहरांची वाढ, नगररचना, घरबांधणी, लोकसंख्या, त्या लोकसंख्येची जडणघडण, शहरनियोजन, नागरी पर्यावरण, शहरांत उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा, श्रमांची शहरी बाजारपेठ यांसारख्या विविध बाबींवर नेमका कसा पडतो आहे, यांचे तपशीलवार चित्र रेखाटणारे संशोधनसाहित्य मात्र अजूनही फारसे समोर येत नाही. प्रस्तुत ग्रंथ हे त्या दिशेने उचलले गेलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. ■■

RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: L-2/RNP/PNW/M 125/2007-2009
Licensed to Post Without Prepayment, LICENCE NO. LWP-228
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

●अजित कर्णिक ●विकास चित्रे ●अभय टिळक ●कुमुदिनी दांडेकर
●ललित देशपांडे ●द.ना. धनागरे ●आनंद नाडकर्णी
●सुहास पळशीकर ●रमेश पानसे ●मनोहर भिडे ●योगेंद्र यादव ●नीळकंठ रथ
●व्ही.एम्.राव ●ए.वैद्यनाथन ●रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**